



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ३९ * नांदेड * मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मिनी मंत्रालय निवडणुकीत महायुतीचा बोलबाला

- सिंधुदूर्ग, सोलापूर स्वबळावर भाजपकडे
- पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत
- रत्नागिरीत शिवसेनेला यश
- लातूरमध्ये काँग्रेस सर्वात मोठा पक्ष

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील १२ जिल्हा परिषदेचा निकाल जाहीर झाला आहे. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात होते. १२ जिल्हा परिषदेच्या ७३१ तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी शनिवारी मतदान झालं होतं. या निवडणुकीत महायुतीचा बोलबाला पहावयास मिळाला.

राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांचा समावेश आहे. यामध्ये रायगड जिल्हा परिषदेमध्ये भाजपला १५, शिवसेना- २१, राष्ट्रवादी काँग्रेस- १६, शिवसेना ठाकरे गट - ५, काँग्रेस -२ मिळाल्या आहेत. रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये भाजप- ०४, शिंदे शिवसेना - ४०, राष्ट्रवादी अजित पवार गट- ५, शिवसेना ठाकरे गट - ६, मनसे -१ जागा मिळाली आहे. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमध्ये भाजप -२७, शिवसेना -१४, शिवसेना ठाकरे गट -३ तर अपक्ष ६ उमेदवार निवडून आले आहेत. पुणे जिल्हा परिषदेमध्ये भाजप -१०, शिवसेना -४, राष्ट्रवादी अजित पवार गट -४८, राष्ट्रवादी शरद पवार गट -१, शिवसेना ठाकरे गटाला ६ जागा मिळाल्या आहेत. सातारा जिल्हा परिषदेमध्ये भाजप - २३, शिवसेना - १३, राष्ट्रवादी - २२, काँग्रेस १ व २ जागा इतरला मिळाल्या आहेत. सांगली जिल्हा परिषदेमध्ये भाजप - १६, राष्ट्रवादी अजित पवार गट -६, काँग्रेस - ११, शिवसेना शिंदे गट -७, राष्ट्रवादी शरद पवार गट -१८, शिवसेना ठाकरे गट - १, जनसुराज्य - ०१, रयत क्रांती (सदाभाऊ खोत) - १ जागा मिळाल्या आहेत. कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये भाजप - १२, शिवसेना शिंदे गट -९, राष्ट्रवादी काँग्रेस - २०, काँग्रेस - १५, शिवसेना (ठाकरे) -१, जनसुराज्य -६, स्वाभिमानी शेतकरी संघटना -१, शाहू आघाडी राजेंद्र पाटील यड्रावकर गटाला ४ जागा मिळाल्या आहेत. सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये भाजप - ३६, शिवसेना - ५, राष्ट्रवादी - १०, राष्ट्रवादी शरद पवार -७, शेकाप - ३, इतरला २ जागा मिळाल्या आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेमध्ये भाजप - २३ आणि पुरस्कृत २, शिवसेना -२१ आणि पुरस्कृत १, शिवसेना ठाकरे गट -९, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट -४, राष्ट्रवादी (पान ३ वर...)

**पक्षनिहाय मिळालेल्या जागा**

| | |
|---|---|
| भाजप | २३५ |
| राष्ट्रवादी काँग्रेस अ.प. | १७२ |
| शिवसेना शिंदे गट | १४९ |
| काँग्रेस | ५७ |
| राष्ट्रवादी काँग्रेस श.प. | २७ |
| शिवसेना ठाकरे गट | ५४ |
| इतर | ३९ |

# पहिल्या पेपरला झूम वेबकास्टद्वारे परीक्षा केंद्रांवर कडक नजर -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** आज दि. १० फेब्रुवारी रोजी इयत्ता बारावीचा इंग्रजी विषयाचा पहिला पेपर होत असून, या दिवशी जिल्ह्यातील सर्व ११२ परीक्षा केंद्रांवर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे संपूर्ण वेळ परीक्षेचे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज दिली.

शासनाच्या निर्देशानुसार यावर्षीची इयत्ता बारावीची परीक्षा १०० टक्के कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथकांद्वारे झूम वेबकास्टच्या माध्यमातून थेट निरीक्षण करण्यात येणार असून परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार आहे.

याशिवाय जिल्ह्यात महसूल विभागाचे विभागप्रमुख, जिल्हा परिषदेचे विभागप्रमुख, उपविभागीय अधिकारी, तसेच तालुका स्तरावरून तहसीलदार व गटविकास अधिकारी यांची भरारी पथके कार्यरत राहणार आहेत. शिक्षण विभागाची सहा विशेष पथके देखील परीक्षेवर बारकाईने लक्ष ठेवणार आहेत.

तसेच स्वतः जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक हे देखील जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व परीक्षार्थी विद्यार्थी तसेच परीक्षा यंत्रणेत कार्यरत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परीक्षा कॉपीमुक्त, शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# सोशल माध्यमावरून पक्ष बदलाच्या अफवा; मी राहुल गांधींचा मावळा -खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** काही विरोधक सोशल माध्यमांवरून मी काँग्रेस सोडून भाजपत जाणार अशा अफवा उठवत आहेत. मात्र मी खा. राहुल गांधींचा मावळा आहे. काँग्रेसचा निष्ठावंत आहे. अशा अफवांमुळे मी डगमगणार नाही. जनतेने व कार्यकर्त्यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन खा. रवींद्र चव्हाण यांनी केले आहे.



नांदेडचे काँग्रेस खा. रवींद्र चव्हाण हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची पोस्ट सोमवारी सोशल मीडियावर काहींनी टाकल्यामुळे जिल्हाभरात चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर खा. चव्हाण यांनी ही पोस्ट म्हणजे निव्वळ अफवा असून अशा चुकीच्या पद्धतीने सोशल मिडीयातून अफवा पसरविणे म्हणजे मला बदनाम करण्याचा कुटील डाव आहे. जिल्ह्यात काँग्रेसचे पक्ष संघटन मजबूत होत आहे. इतर पक्षांतील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते काँग्रेसच्या संपर्कात आहेत, त्यामुळे विरोधी पक्षातील नेत्यांच्या पायाखालची वाळू घसरली आहे. काँग्रेसविषयी त्यांच्या उरात धडकी भरल्यामुळे असे जाणीवपूर्वक प्रकार करण्यात येत आहेत.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी काँग्रेसने कंबर कसली असून या निवडणुकीत काँग्रेस जिल्ह्यात नंबर एकचा पक्ष म्हणून सिद्ध होईल, असा विश्वासही खा. रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

# आज विशेष सभेत महापौर, उपमहापौरांच्या निवडीची औपचारिकता

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड महापालिकेवर पहिल्यांदाच भाजपचा झेंडा फडकला आहे. मनपा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपने एकहाती सत्ता मिळवली. भाजपच्या पहिल्या महापौर म्हणून कविता मुळे तर उपमहापौरपदी दीपकसिंह रावत यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे. मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी या दोघांच्या निवडीची औपचारिक निवड फक्त बाकी आहे.



जिल्हाधिकारी तथा पिठासन अधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत आज सकाळी ११ वाजता विशेष सभा होणार आहे. या सभेत ही घोषणा होणार आहे. नांदेड वाघाळा शहर महापालिका स्थापनेच्या इतिहासात अपवाद वगळता काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता राहिली आहे. १३ वेळा काँग्रेसचेच महापौर झाले. तर एकवेळा शिवसेनेचा महापौर झाला होता. मात्र काँग्रेसचे तत्कालीन नेते माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तेव्हाही नांदेडकरांनी काँग्रेसला साथ दिली आणि याही निवडणुकीत पक्ष बदलल्यानंतर अशोकराव चव्हाण यांच्यासोबतच नांदेडची जनता गेली. महापौर आणि उपमहापौर निवडणूक बिनविरोध होऊ नये, यासाठी काँग्रेस- वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम यांनीही या पदासाठी आपले नामांकन पत्र दाखल केले आहेत. परंतु भाजपचे ४५ आणि शिवसेना शिंदे गटाचे चार असे ४९ सदस्य भाजप-शिवसेना महायुतीत असल्याने काँग्रेस-वंचित आणि एमआयएमच्या विरोधाचा भाजप-शिवसेनेला फारसा फरक पडणार नाही हे स्पष्ट आहे.

महापालिकेत भाजपच्यावतीने आपला पहिला महापौर विराजमान होत असल्याने जय्यत तयारी केली असून सभागृह आणि महापालिकेसमोर कमानी उभारण्यात आल्या आहेत.

# नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या १९९ पोलीस शिपाई भरतीसाठी बुधवारपासून प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक नांदेड यांच्या आस्थापनेवरील १९९ पोलीस शिपाई पदासाठी दि. ११ फेब्रुवारी २०२६ पासून भरती प्रक्रिया प्रारंभ होणार असून पोलीस प्रशासनाने जय्यत तयारी सुरू केली आहे.

पोलीस अधीक्षक नांदेड यांच्या आस्थापनेवरील १९९ पोलीस शिपाई पदासाठी एकूण १४,६८२ उमदेवारांचे आवेदन अर्ज प्राप्त झाले आहेत, ही भरती प्रक्रिया ११ फेब्रुवारी २०२६ पासून सुरु होणार आहे. ही प्रक्रिया डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने पारदर्शक व निष्पक्ष पध्दतीने राबविण्याची तयारी पोलीस प्रशासनाने केली आहे. नांदेड पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर भरतीची मैदानी चाचणी होणार असून, सदर भरती बंदोबस्ताकरिता १ पोलीस अधीक्षक, २ अपर पोलीस अधीक्षक, ५ उप विभागीय पोलीस अधिकारी, ६० पोलीस अधिकारी तसेच २५० पोलीस अंमलदार यांना नेमण्यात आले आहे.

मैदानी व शारीरिक चाचणीला ११ फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात होईल. या चाचणीनंतर पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. भरती प्रक्रियेचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने जाहीर केले जाणार असून उमेदवारांना संबंधित सुचना अधिकृत संकेतस्थळ आणि संदेशाद्वारे दिल्या जाणार आहेत.

शारीरिक चाचणीत उमेदवारांची उंची व छाती मोजणी, १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे (महिला उमेदवारांसाठी ८०० मीटर) आणि गोळाफेक अशा घटकांचा समावेश असेल. या चाचणीसाठी १०० गुण असुन, त्यात किमान ५० गुण मिळवणे आवश्यक राहणार आहे.

भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी संपूर्ण शारीरिक चाचणी आरएफआयडी तंत्रज्ञान, बायोमॅट्रिक, ॲटो फोटो कॅप्चर तंत्रज्ञानाच्या मदतीने आणि सीसीटीव्हीच्या निगराणीखाली घेण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांची उपस्थिती, धावण्याची वेळ आणि चाचणीतील कामगिरी अचूक नोंदविता येणार आहे. या प्रणालीमुळे मानवी हस्तक्षेपाचा प्रश्नच उद्भवत नाही.

सदर भरतीमध्ये कुठल्या प्रकारचे गैरव्यवहार गैर प्रकार होऊ नये याकरिता १०० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, ड्रोन कॅमेरे व गोपनीय शाखेचे साध्या वेशातील अंमलदार यांना पाळत कामी ठेवण्यात येणार आहे, उमेदवारांनी कोणत्याही कर्मचारी किंवा मध्यास्थाच्या भूलथापांना, आश्वासनाला बळी पडू नये. कोणी पैशांची मागणी केल्यास जवळील पोलीस ठाणे, डायल-११२ किंवा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचेकडे संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.







# तब्येत बिघडल्याने शरद पवार पुण्यातील रूग्णालयात दाखल

**पुणे (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना रुग्णालयात तपासणीसाठी नेण्यात आलं आहे. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर गेल्या काही दिवसांपासून ते आपल्या बारामती, मुंबई आणि पुण्यातील घरी दौरे करत होते. तर, राज्यभरातून राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांच्या भेटीसाठी, त्यांचे सांत्वन करण्यासाठी येत. दरम्यान, सोमवारी शरद पवार यांना खोकल्याचा त्रास जाणवू लागल्याने पुण्यातील रुबी क्लिनिकमध्ये तपासणीसाठी नेण्यात आलं आहे.



शरद पवारांना खोकल्याचा त्रास होत असल्याने पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमधे तपासणीसाठी नेण्यात येणार आहे. रूबी हॉल क्लिनिकचे प्रमुख डॉ. परवेझ ग्रँट यांना तसे कळविण्यात आले आहे. डॉ. परवेझ ग्रँट तपासणीनंतर शरद पवारांना एडमिट करायचे की, उपचार करून घरी पाठवायचे याबाबतचा पुढील निर्णय घेतील. शरद पवारांच्या कन्या आणि खासदार सुप्रिया सुळे त्यांच्यासमवेत रुबी हॉस्पिटलमध्ये आहेत. दरम्यान, सोमवारी सकाळपासूनच शरद पवार यांना खोकल्याचा त्रास होत आहे. रुबी हॉलचे डॉक्टर ग्रँट यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही वेळात शरद पवार यांना आम्ही तपासून घेऊ. त्यांच्यावर काय उपचार करायचे आहेत ते ठरवलं जाईल आणि जर गरज वाटली तर त्यांना ॲडमिट केलं जाईल. परिस्थितीनुसार आम्ही निर्णय घेऊ, असे डॉक्टरांनी सांगितले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शहरीकरण : भारताच्या भविष्याचा वेग आणि आव्हान

भारत आज आर्थिक विकासाच्या वेगवान टप्प्यावर उभा आहे. हा विकास केवळ आकड्यांपुरता मर्यादित न राहता सामाजिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणत आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहे ते वेगाने होत असलेले शहरीकरण. आज शहरीकरण हा केवळ पर्याय उरलेला नसून तो देशाच्या प्रगतीसाठी अनिवार्य घटक बनला आहे. बदलते आर्थिक वास्तव पाहता भारताचे भविष्य आता खेड्यांपेक्षा अधिक शहरांमध्ये घडताना दिसत आहे. राजकीय आणि सामाजिक भाषणांमध्ये 'खरा भारत खेड्यात आहे' असे म्हटले जाते. मात्र, आर्थिक वास्तवाचा विचार केला, तर रोजगार, उद्योग, नवोन्मेष, भांडवली गुंतवणूक आणि जागतिक स्पर्धेचे केंद्र आज शहरं झाली आहेत. देशाचा मोठा आर्थिक भार आता शहरी अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. आगामी काळातही हीच दिशा अधिक ठळक होणार आहे. एका अभ्यासानुसार २०३० पर्यंत भारताच्या एकूण सकल उत्पन्नांपैकी अर्थात जीडीपीपैकी सुमारे ७० टक्के योगदान हे देशातील सर्वोत्तम शंभर शहरांकडून येईल. याच कालावधीत ७० टक्के नवीन रोजगार संधी शहरांमध्ये निर्माण होतील. आज भारतातील शहरी लोकसंख्या सुमारे ४० कोटींच्या आसपास आहे; मात्र २०३० पर्यंत ही संख्या ६० ते ६५ कोटींवर जाण्याचा अंदाज आहे. गेल्या चार दशकांतील शहरी लोकसंख्या वाढीपेक्षा अधिक वाढ पुढील दहा वर्षांत होण्याची शक्यता आहे. मुंबई, दिल्लीसारख्या महानगरांची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत सुमारे २५ हजार कोटी रुपयांच्या समकक्ष असेल, जी अनेक देशांच्या वार्षिक जीडीपीपेक्षा अधिक आहे. याचप्रमाणे मुंबई, दिल्ली आणि कोलकाता या तीन महानगरांची एकत्रित लोकसंख्या ऑस्ट्रेलियाच्या एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त असेल. ही आकडेवारी केवळ संख्यात्मक बदल दर्शवत नाही, तर शहरांवर येणाऱ्या प्रचंड ताणाचाही इशारा देते. शहरी लोकसंख्येतील वाढ ही केवळ ग्रामीण भागातून होणाऱ्या स्थलांतरामुळे होत आहे, असा गैरसमज अनेकदा केला जातो. प्रत्यक्षात शहरांतील लोकसंख्या वाढीपैकी सुमारे ८० टक्के वाढ ही शहरांच्या सीमाविस्तारामुळे झाली आहे. लगतची गावे, उपनगरे आणि निमशहरी भाग शहरात सामील होत आहेत. ग्रामीण स्थलांतराचा वाटा केवळ २० टक्क्यांच्या आसपास आहे. त्यामुळे शहरीकरणाचा प्रश्न हा केवळ 'स्थलांतराचा' नसून 'नियोजनाचा' आहे. शहरी भागातील नागरिकांचे सरासरी उत्पन्न हे ग्रामीण भागाच्या तुलनेत जास्त आहे. वाढत्या उत्पन्नासोबतच घर, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक आणि इतर मूलभूत सुविधांची मागणीही वाढत आहे. त्यासोबतच गुन्हेगारी समाजातील लोकांची वाढती संख्या देखील सामाजिक सुरक्षेसाठी धोका निर्माण करणारी झाली आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी शहरांची पायाभूत रचना मजबूत करणे अत्यावश्यक आहे. मात्र आजची परिस्थिती पाहता बहुतांश भारतीय महानगरे या बाबतीत जागतिक सरासरीपेक्षा मागे आहेत. २०३० पर्यंत भारताचे शहरीकरण योग्य आणि शाश्वत दिशेने नेण्यासाठी सुमारे ५५ लाख कोटी रुपयांहून अधिक भांडवली गुंतवणुकीची आवश्यकता आहे. हा खर्च सध्याच्या शहरी विकासावरील गुंतवणुकीच्या तुलनेत तब्बल आठपट अधिक आहे. जर ही गुंतवणूक वेळेत आणि योग्य नियोजनाशिवाय केली नाही, तर शहरांतील जीवनमान अधिकच बकाल होण्याचा धोका आहे. पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, सांडपाणी व्यवस्थापनाचा अभाव, कचऱ्याचा प्रश्न, वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि अनधिकृत बांधकामे ही संकटे दोन ते चार पटींनी वाढू शकतात. म्हणूनच शहरीकरणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नियोजनबद्ध विकास, स्मार्ट पायाभूत सुविधा, सार्वजनिक-खासगी भागीदारी, स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक व प्रशासकीय सक्षमतेची जोड आणि दीर्घकालीन दृष्टीकोन या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. शहरांचा विस्तार हा केवळ भौगोलिक नसून तो सामाजिक आणि आर्थिक समावेशकतेचा असायला हवा. भारताचा आर्थिक विकास वेगाने पुढे न्यायचा असेल, तर शहरीकरणाला विरोध न करता त्याचे योग्य नियोजन करणे हाच एकमेव मार्ग आहे. दूरदृष्टीने घेतलेले धाडसी निर्णयच शहरांना विकासाचे इंजिन बनवू शकतात आणि त्या माध्यमातून देशाच्या प्रगतीचे फळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू शकते.

# जिंदगी के मेले...चलतेही रहेंगे!!

जन पळभर म्हणतील हाय हाय
मी जाता राहील कार्य काय ?

प्रसिद्ध कवी भा. रा. तांबे. यांच्या कवितेतील या ओळींची शीर्षस्थानी मांडणी यासाठी, की आजच्या भौतिक समृद्धीने नटलेल्या समाजात, नाशवंत देहाला चिकटून बसलेल्या व त्या देहाचे चोचले पुरवणाऱ्या माणसाची अवस्था हास्यास्पद झाली असून, वरील ओळींतून स्पष्ट लक्षात येते की, मनुष्याचे जीवन क्षणभंगुर असून, पृथ्वीतलावरील अनिश्चित गोष्ट जर कोणती असेल तर ती माणसाला लाभलेले औटघटकेचे जीवन. मगे हे असे असूनसुद्धा, आजचा माणूस ,हे लाभलेले शरीर कधीच न संपणारी संपत्ती असल्यासारखे जगतो. माणसाला वाटतं, की पृथ्वीतलावरील कार्य मी गेल्यावर संपेल की काय ? नेमके हेच आभासी विचाराचे चे पांघरूणवरील ओळी दूर करतात. वास्तव तर हेच आहे की, पृथ्वीच्या किंवा मानव सृष्टीच्या निर्मितीपासू चराचरातील प्रत्येक घटक, अथवा मानव उत्पत्ती, स्थिती व समाप्ती या न्यायाने जगत व मरत असतो. जन्म व मृत्यू ह्या जीवन रुपी नाण्याच्या अटळ वास्तविक बाजू असून, ही गोष्ट लक्षात घ्यायला आजचा आधुनिक माणूस तयार होत नाही. परंतु वास्तवापासून आपण दूर गेलो तरी ते वास्तव मिटणार नसते किंवा सूर्याचा प्रकाश लपवण्यासाठी कितीही पडदा लावला तरी तो प्रकाश आपण लपवू शकत नाही. तद्वतच आपण या क्षणभंगुर शरीरास, जीवनास कितीही चिकटून बसलो, तरी एक दिवस याचा अंत निश्चित आहे . जर हे असे असेल, तर या कवडीमोल देहाचा आपण किती लोभ बाळगावा? त्याच्या मोहात आपण किती काळ अडकावे ? हा चिंतनाचा विषय आहे.

मैं पल दो पल का शायर हू
पल दो पल मेरी कहानी है

ह्या वरील ओळी आपणास या वास्तवाची आठवण करून देतात की जीवनाच्या रंगमंचावरीलआपण वेगवेगळे नट व कलाकार असून, आपली भूमिका आपण वटवत असतो व त्या भूमिकेला एका दिवशी नक्कीच पूर्णविराम लागणार असतो. म्हणून आपल्या जीवनाची कहाणी,अनिश्चित काळासाठी व क्षणाची असते म्हणून या अनिश्चीत असलेल्या जीवनरूपी कथेला, भूमिकेला अनुसरून व स्वीकारून तसेच विनाशी शरीराला चिकटून न राहता, भा. रा. तांबे ,यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, आपल्या येण्याने व जाण्याने, पृथ्वीतलावरील कुठलीच कार्य बंद पडत नाही, चंद्र सूर्य व तारका यांचे कार्य अखंड चालू



राहते, तसेच माणसाच्या जाण्याने कुठलेच कार्य बंद पडत नसते ,म्हणून अविचारी माणसाने ही बाब कटाक्षाने लक्षात घेऊन ,जीवन आनंदाने जगून त्यात इतरांना आनंद वाटून, इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन, आपल्या सकारात्मक कार्याची छाप समाजावर ठेवून एक दिवस या जगाचा निरोप आपल्याला घ्यायचा आहे याचे आत्मभान ठेवून जर हे जीवन जगले, तर माणसाच्या जीवनातील दुःख कमी व्हायला मदत होईल.

कोरोना काळात अनेक माणसे मृत्यूच्या गावाला गेली. ती माणसे गेली म्हणून समाजाचे कार्य बंद पडले नाही. वास्तव तर हेच आहे, की कुणाच्यातरी जाण्याने काही दिवस लोक शोक करतील, आप्त नातेवाईक दुःख व्यक्त करतील, परंतु कुणाचेही जगणे थांबणार नाही म्हणून मनुष्याने नियतीच्या या कठोर वास्तवाच पालन करून, आपल्याला भूमिका वठवण्याठी जेवढा काळ लाभलेला आहे, त्या काळाचा सुंदर व सकारात्मक उपयोग करून जीवन जगले, व भौतिक जीवनास चिकटून विनाशी शरीराचे लाड पुरवण्याच निरर्थक कार्य बंद केल व जीवनाला वैचारिक व वास्तविक दृष्टीने पाहिले तर सत्य हेच आहे की,

ये जिंदगी के मेले
दुनिया मे कम नही होंगे
मगर अफसोस हम नही होंगे

वरील ओळीमध्ये म्हटल्याप्रमाणे, जीवनसृष्टी चालत आलेली आहे, व ती पुढेही तशीच चालत राहील, त्यामुळे प्रत्येकाने जीवन जोपर्यंत आहे तोपर्यंत आनंद वाटावा, आपल्या जीवनातून माणुसकीचे अप्रतिम दर्शन घडवाव. श्रीमंतीत अहंकाराने न माजता, जीवनाला विनम्रतेने जगावे. ही जीवनरूपी यात्रा चालतच राहणार आहे, मात्र हेही तेवढेच निश्चित, की प्रत्येकच यात्रेचा लाभ आपणास घेता येणार नाही, आपणास प्रत्येक यात्रेचा लाभ घेता येणार नाही, याचा अर्थ यात्रा होणार नाही असा निश्चितच होत नाही. म्हणून सृष्टी केवळ आपल्या मुळे आहे, व माझ्यानंतर तिचे काय याची निरर्थक चिंता न करता, मला लाभलेल्या आयुष्यातून मी माझ्या नंतरही लोकांच्या स्मरणात कसा राहील, याकडे लक्ष देऊन आपले कार्य आदर्श बनवण्याचा ,प्रांजळ प्रयत्न करणे एवढेच आपल्या हातात आहे. आयुष्याचा पहिला टप्पा जन्म, दुसरा टप्पा जीवन व तिसरा टप्पा मृत्यू असून मधल्या टप्प्याचे सुवर्ण करण्याची संधी आपल्याच हातात आहे.

आपल्या मातृभूमीला लाभलेल्या थोर महापुरूषांची परंपरा आपणास काय शिकवते ? तर मनुष्य केवळ शरीराने विनाश पावतो पण त्याचे कार्य व विचार हे अविनाशी व अमर असतात.आपल्या कार्यातून आदर्श चमत्कार घडवल्या शिवाय इतरांच्या मनात नमस्काराची भावना जागृत करता येत नाही. म्हणून, आपल्या जीवनाच गीत गाताना, केवळ आपण एकटेच गायक नाहीत, आपल्या नंतरही या धरतीवरती अनेक गायक येणार आहेत व त्यानंतर ही जीवनाच गीत ते गानारच आहेत.. हे सत्य आहे व ते शाश्वत आहे. डोळ्यांना न दिसणाऱ्या पण मनाला जाणवणाऱ्या कार्याची छाप किंवा कर्तुत्वाचा चमत्कार हा कायमस्वरूपी राहतो. त्यामुळे विनाशी शरीराच्या मोहात न अडकता, वास्तवाचे भान ठेवून समाज उपयोगी कार्य आपल्या हातून घडले, तर ते काळाच्या पडद्यावर कायम राहील. डोळ्यांना दिसणारी प्रत्येक मूर्त बाब, ही विनाशी व लोप पावणार आहे, ही खूणगाठ मनाशी बांधल्यावर या जीवनाचा अनिश्चित प्रवास सुद्धा आनंदी करता येतो. आपल्या नंतर येणाऱ्या पिढीला, आपल्या आदर्श जीवनाची पायवाट घालून दिली, तर ती पायवाट निश्चित अमर असणार आहे,रस्ते कधीच नष्ट होत नसतात तर त्यावरून चालणारी माणसे संपतात, म्हणून वैचारिक अविनाशी रस्ते किंवा वाटा आपण निर्माण करून ठेवल्या तर, पुढच्या पिढीच्या आपण कायम स्मरणात राहू.

कुठल्याच मनुष्याला अमरत्वाचे वरदान लाभलेले नसल्यामुळे, मी अमर राहील या अविर्भावात जीवन जगणे ही धोक्याची घंटा असून, काळाच्या पाऊलखुणा वेळीच लक्षात घेतल्या तर जीवनाचा प्रत्येक क्षण आनंदाने जगता येईल. काळ व मृत्यू यांच्या निष्ठूर जबड्यातून कुणाचीच सुटका होऊ शकत नाही ही बाब माहिती असून सुद्धा ,त्याकडे दुर्लक्ष करून अमरत्वाचे वरदान मिळल्यागत जगणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होय. त्यामुळे

आपण आपल्याला जेवढी भूमिका मिळाली आहे तेवढी प्रांजळपणे निभावत जाणे व आपल्या भूमिकेचा आदर्श पुढच्या पिढीसाठी निर्माण करून देणे, हे एवढे कार्य मात्र आपण निश्चित करू शकतो.अनिश्चित अशा जीवन काळात, महापुरुषांनी युगानुयुगे चालणारे अविनाशी कार्य निर्माण केले आहे, म्हणून अशा प्रकारच्या कार्याला मात्र कधीच अंत नसतो.... हेही तेवढेच खरे.

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहिपिंपळगाव
ता. मुदखेड. जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# प्रेम-जीवन घडवतो आणि बिघडवतो

प्रेमाविषय आता बोलायला गेले तर आजच्या परिस्थिती मध्ये प्रेमाची व्याख्याच पूर्णपणे बदललेली आहे . एक काळ असा होता की जेव्हां मुलगा मुलगी ही लग्नाच्या वेळीच आपल्या जोडीदाराला भेटत. मात्र सध्या अगदी लहान वयातही मुल- मुली एकमेकाच्या प्रेमात पडत आहेत. किशोरवयात एकमेकांप्रती असणाऱ्या आकर्षणाला कित्येक मुलं - मुली प्रेम समजतात. शिक्षण घ्यायच्या वयामध्ये प्रेमात आपला वेळ वाया घालवतात. आणि शिक्षनाकडे आणि आपल्या जीवनातील ध्येयाकडे दुर्लक्ष करत असतात.आता तर फेब्रुवारी महिना म्हणजे प्रेमविरांचाच आहे .या महिन्याची प्रेमी लोक वर्षभरापासून वाट बघत असतात. आणि आपले प्रेम वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त करत असतात. प्रेमासाठी तर प्रत्येकच दिवस असतो. तरीपण आपण वृत्तपत्रामध्ये दररोज वाचत असतो की, प्रियकरानेच प्रेयसी ची हत्या केली, प्रेमभंग झाल म्हणुन मुलाने आत्महत्या केली.



प्रेमाला आईवडिलांचा विरोध म्हणून अल्पवयीन मुलमुली घर सोडून पळून गेली. अश्या बातम्या आपण नेहमी वाचतोच. प्रेम करणे ही वाईट गोष्ट अजिबात नाहीं. परंतु प्रेमासाठी किंवा कोणत्या मुलीसाठी आत्महत्या करणे , आईवडिलांच्या विरोधात जाऊन प्रेमविवाह करणे, हे कितपत योग्य आहे. आपल्या आईवडिलांनी आपल्याला येवढं मोठं केलं , आपल्याला येवढं प्रेमात वाढवलं. आणि आपण प्रेमभंग झालं म्हणुन आत्महत्या करतो .आपल्या आईवडिलांचा विचार सुद्धा करत नाही. त्यांच्यावर किती आघात होत असणार. आपले हे अमूल्य जीवन आपण असच वाया घालवतो आहे.मग प्रेम करायचच आहे तर असे करा की ज्यामुळे आपल्या जीवनाला कलाटणी येणार ज्यामुळे आपले जीवन सार्थक होईल.ज्याच्यामुळे आपल्याला जिवनात प्रगती करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. म्हणतात की, प्रेमामध्ये खूप ताकत आहे. प्रेम अशी नशा आहे की एकतर जिवन पूर्णपणे बदलवतो किंवा पूर्णपणे जिवन बरबाद करतो. आपण अनेक सक्सेस लोकांच्या गोष्टी ऐकल्या असतील. ते सांगत असतात की त्यांचा जीवनात त्यांच्या प्रियकर किंवा प्रेयसीनी कस त्यांचं जीवन बदलवलं. त्यांना कशाप्रकारे हिम्मत दिली. ज्यामुळे ते आज एक सक्सेस व्यक्तिमत्व आहेत. असा आपण खूप लोकांचा जीवनप्रवास ऐकत असतो. पण मी काही लोक असे पण बघितलं आहे की कुणाला प्रेम झाल तर मग जीवनातील आपला ध्येय, किंवा कोणतेपण महत्वाचे कामे सोडून प्रेमात आंधळे होत असतात. आणि जीवनातील महत्वाची वेळ फक्त मुलीसोबत हिंडणे फिरणे मध्ये वाया घालवत असतात.

जे वेळ शिकण्याची असतो तेव्हा शिक्षणात दुर्लक्ष करत असतात. शेवटी पश्चातापाशिवाय हाती काहीच नसतो. मग अशा लोकांची मानसिकता बिघडतो. मग मनामध्ये नकारात्मक विचार येत असतात. आत्महत्याचे विचार करतात. जसं आता आपण बघतो की अनेक मुलमुली आईवडिलांच्या विरोधात जाऊन प्रेमविवाह करतात. तरीपण त्यांचं लग्न जास्त दिवस टिकतांनी आपल्याला दिसत नाही. आपापसातील मतभेद आता खूप वाढतांनी दिसतो. कुणी कुणाचं ऐकायला तयार नाही. प्रेमविवाह करून सुद्धा बाहेर आणखी अफेयर करण्याचे प्रमाण वाढले आहे. ज्यामुळे लग्न आता जास्त दिवस टिकतांनी दिसत नाही. आणि यामुळेच घटस्फोट घेण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रेमाची व्याख्याच आता लोकांनी बदलवून टाकली आहे . माझे प्रेमाला विरोध नाही, पण तरुण मुलांमुलीने आधी स्वतःच्या जीवनाकडे व आईवडिलांनी आपल्यासाठी बघितलेल्या स्वप्नाकडे लक्ष देण्याची गरज आहे. आईवडिलांनी आपल्याला येवढं सुंदर आयुष्य दिलं आहे ह्या जीवनाचं काही तरी सार्थक करायला पाहिजे. आपले जिवन खूप अनमोल आहे याला असच वाया न घालवता प्रत्येक वेळेचा उपयोग केला पाहिजे. शेवटी आपल्यावरच अवलंबून आहे की आपले जीवन आपल्याला घडवायचं आहे की बिघडवायचं आहे.

**-प्रिती व्ही. खोब्रागडे**
मु. गुरढा, ता. लाखनी
मो. -७२१९५१५४४८

# स्वस्त व सुलभ आरोग्यसेवा सरकारांची जबाबदारी



सरकारे लोकांना आरोग्याचा अधिकार देण्याच्या नावाखाली मोफत उपचार योजना जाहीर करतात, पण त्याचा फायदा सर्वांना मिळतोच असे नाही. पंचतारांकित हॉटेलांसारखी रुग्णालये सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरच आहेत. वाढत्या उपचारखर्चाच्या पार्श्वभूमीवर, आरोग्यसेवा वाढवली गेली असली तरी एखादा रुग्ण उपचाराविना राहिला, तर लोककल्याणकारी म्हणवणाऱ्या सरकारांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते.

गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या देशात आरोग्यसेवा सुधारण्यासाठी बरीच कामे झाली आहेत, हे नाकारता येणार नाही. परंतु आजही सर्वसामान्य लोकांना स्वस्त व सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध होणे एक मोठे आव्हान आहे. आरोग्यसेवा महागड्या होण्यामागील मोठे कारण म्हणजे आजपर्यंत सर्वसामान्यांपर्यंत या सेवा पोहोचविण्यासाठी सरकारी स्तरावर पुरेसे प्रयत्न झालेले नाहीत. कर्नाटक उच्च न्यायालयाने अलीकडच्या एका निर्णयात असे निरीक्षण नोंदवले आहे की आरोग्य व वैद्यकीय सेवा या नागरिकांचा मूलभूत हक्क आहे आणि सरकारे त्यापासून दूर पळू शकत नाहीत. न्यायालयाने एका समितीच्या स्थापनेचे आदेश दिले आहेत, जी राज्यातील वैद्यकीय कर्मचारी, आरोग्य सुविधा आणि मूलभूत सोयीसुविधांची देखरेख करेल.

न्यायालयाने ही टिप्पणी केली कारण राज्यात १६,००० पेक्षा जास्त वैद्यकीय कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे त्याच्या लक्षात आले. केवळ कर्नाटकच नव्हे, तर देशातील कोणत्याही भागात वैद्यकीय सुविधांची स्थिती जवळपास सारखीच आहे. सरकारी रुग्णालयांची स्थिती, विशेषतः ग्रामीण भागात, फारच वाईट आहे. कुठे रुग्णालये आहेत, पण डॉक्टर नाहीत, तर कुठे डॉक्टर आहेत, पण पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत.

देशातल्या विविध सरकारांनी असे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की प्रत्येक व्यक्तीला आरोग्यसेवा मिळावी, ज्यामुळे त्यांना आरोग्यावर खर्च करताना आर्थिक संकटाचा सामना करावा लागणार नाही. साधारणत: देशातील सुमारे ६ कोटी लोक दरवर्षी आरोग्यसेवेसाठी जास्त खर्च करण्यामुळे गरीबी रेषेखाली ढकलले जातात. दुर्गम भागात ही समस्या अधिक गंभीर आहे, जिथे वेळेवर उपचार मिळत नसल्यामुळे रुग्णांचे प्राण धोक्यात येतात.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की वाढत्या महागाईचा परिणाम सामान्य माणसावर अधिक होत आहे कारण त्याच्या उत्पन्नाचा मोठा भाग महागड्या शिक्षण आणि वैद्यकीय सेवांवर खर्च होतो. सरकारे 'आरोग्याचा हक्क' याबाबत मोठ्या गोष्टी करतात, पण प्रत्यक्षात सामान्य जनतेला त्याचा लाभ मिळताना दिसत नाही. त्यामुळे या दिशेने ठोस प्रयत्नांची गरज आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली

# नारायण कदम : सर्वसमावेशक नेतृत्व

आई-वडिलांची पुण्याई, त्यांचा आशीर्वाद, त्यांनी केलेले संस्कार आणि गावातील प्रत्येक कुटुंबाकडून मिळालेले प्रेम, आपुलकी, पाठबळ यामुळे स्वकर्तृत्वाने खडकी वडवणा येथील नारायण कदम या तरुणांनी गेल्या पंधरा वर्षांपूर्वी सामाजिक राजकारणात आपले पाऊल ठेवले. आपल्या गावाचा कायापालट झाल्याशिवाय विकासाची दिशा सापडणार नाही, अशी खुणगाठ बांधलेल्या नारायण कदम यांनी अगदी सुरुवातीलाच खडकी वडवणा गावाच्या सर्वांगीण विकासाचा वसा उचलला. गावातील उघड्यावरील हागणदारी बंद करण्यासाठी आणि महिला व मुलींची होणारी मानसिक कुचुंबना थांबविण्यासाठी त्यांनी स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत आपले गाव संपूर्ण हागणदारी मुक्त करून घेण्यासाठी केलेले कार्य अतुलनीय असे राहिले आहे.

नांदेड तालुक्यातील पहिली हागणदारी मुक्त ग्रामपंचायत म्हणून वडवणा खडकी ग्रामपंचायतचा झालेला सन्मान हा ग्रामस्थांच्या अभिमानाचा दिवस होता. त्यामुळे खडकी वडवणा ग्रामपंचायत नांदेड तालुक्यासह मराठवाड्यातील आदर्श ग्रामपंचायत म्हणून पुढे आली. गावाचा नावलौकिक झाला. गावाच्या विकासाच्या नव्या वाटा सुरू झाल्या. विकासाचा निधी मोठ्या प्रमाणात या भागात येऊ लागला. सर्वार्थाने आपल्या गावाचा गावगाडा सुरळीत करण्यामध्ये नारायण कदम यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

खडकी वडवणा ग्रामपंचायतिचा विकास करत असताना गावातील शाळा, पिण्याचे पाणी, बंदिस्त नाली, पांदण रस्ते, डासमुक्त गाव या बाबींना प्राधान्य देत असताना पर्यावरणपुरक गाव म्हणूनही आपल्या गावाच्या विकासासाठी नारायण कदम यांनी घेतलेली भूमिका, केलेले नियोजन अतुलनीय आहे. शासनाच्या प्रत्येक योजना आपल्या गावातील लाभार्थ्यांपर्यंत मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पायऱ्या वारंवार चढणाऱ्या नारायण कदम यांनी तत्कालीन



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ना. हेमंत पाटील, आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या नेतृत्वात शिवसेनेचा भगवा आपल्या खांद्यावर कायमचा ठेवला आहे.

ग्रामीण भागातील महिला व मुलींच्या सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न त्यांनी तितक्यात संवेदनशीलपणे हाताळला आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून गावात आरोग्य शिबिर लावून नागरिकांना दिलासा दिला. खडकी वडवणी सारख्या ग्रामीण भागात ओपन जिम सुरू करणारा पहिला सरपंच म्हणूनही नारायण कदम यांचा उल्लेख केला जातो. ओपन जिम सुरू करून गावाकडच्या तरुणांना सुदृढ आरोग्य देण्यासाठी त्यांनी केलेले प्रामाणिक प्रयत्न उल्लेखनीय राहिले आहेत. त्या कामात आमदार बालाजीराव कल्याणकर यांची त्यांना सातत्याने पाठबळ मिळाले आहे. तर आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या संघर्षमय वाटचालीत आहे नारायण कदम यांनी खंबीर पाठबळ दिली आहे. ज्यावेळी भाई एकनाथराव शिंदे आणि शिवसेनेत बंड करून भारतीय जनता पार्टी सोबत जात सत्ता स्थापन केली होती. त्यावेळी नांदेड जिल्ह्यातून आ.बालाजीराव कल्याणकर यांनी एकनाथराव शिंदे यांच्यासोबत जात केलेल्या संघर्षमय लढाईत आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नारायण कदम हे जिल्ह्यातील पहिले सच्चे शिवसैनिक होत.

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, माँ जिजाऊ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची कास धरून नारायण कदम यांनी केलेली सामाजिक उत्थानाची कामगिरी महत्त्वपूर्ण राहिली आहे. जेव्हा जेव्हा आणीबाणीचा प्रसंग निर्माण झाला. नैसर्गिक आपत्ती आली. सार्वजनिक प्रश्न निर्माण झाले तेव्हा तेव्हा सामाजिक कार्यामध्ये निस्वार्थपणे स्वतःला झोकून देणाऱ्या नारायण कदम यांनी लंगर साहेब गुरुद्वाराला मदत दिली आहे.

हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची विचारधारा अंगीकारलेल्या आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी समाजसेवेचा वसा उचललेल्या नारायण कदम यांनी आता जिल्हा परिषदेच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे . ग्रामीण भागातील अशा उमद्या, ध्येय वेड्या , दूरदृष्टी असलेल्या, परिवर्तनवादी विचारसरणीच्या आणि सामाजिक कार्यास प्रामाणिकपणे बांधून घेतलेल्या नारायण कदम यांच्या पाठीशी जनता निश्चितपणे उभी राहील हा शिवसेनेसह सर्वांनाच विश्वास आहे. आपल्या आई-वडिलाप्रमाणेच आपल्या जिल्हा परिषद गटाची सेवा करण्यासाठी जनतेचा आशीर्वाद आपल्याला हवा आहे इतकी शुद्ध आणि प्रामाणिक भूमिका नारायण कदम यांनी व्यक्त केली आहे.

सामाजिक उत्थानाच्या आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या त्यांच्या स्वप्नांना मूर्त रूप मिळो यासाठी येत्या जिल्हा परिषदेच्या निवडणूक जनता त्यांना आशीर्वाद देऊन विजयी करो. जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांच्या हातून जनविकासाची कामे होण्यासाठी आई तुळजाभवानी त्यांना उदंड आयुष्य आणि निरोगी आरोग्य देवो हीच वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

**-अनिल पाटील बोरगांवकर**
नांदेड
मो. ९८९०८९६००६

## थोडक्यात...

### कपील इंगळे यांना पीएच. डी. प्रदान



**बिलोली (प्रतिनिधी)–** सगरोळी (ता. बिलोली) येथील संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी संचलित कृषी विज्ञान केंद्र येथील कृषी विद्या विषयाचे शास्त्रज्ञ कपिल शिवाजीराव इंगळे यांनी जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठ, झुंझुनू, राजस्थान येथून पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे.

इंगळे यांचे संशोधन कार्य नांदेड जिल्ह्यातील सोयाबीन पिकाच्या वाढी, उत्पादन व आर्थिक लाभांवर तण व्यवस्थापन पद्धतींचा परिणाम या विषयावर आधारित असून, हे संशोधन सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी तण व्यवस्थापनाच्या दृष्टीने उपयुक्त व लाभदायक ठरणार आहे. संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या सकारात्मक वातावरणा-मुळे व सहकाऱ्यांच्या प्रेरणेने हे संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या यशाबद्दल संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख (अण्णा) कार्यकारी संचालक रोहित देशमुख, कृषी विज्ञान केंद्राच्या प्रमुख डॉ. माधुरी रेवणवार, सहकारी अधिकारी, मित्र व नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

### राहूल दि. जोंधळे नेट उत्तीर्ण



**नांदेड (प्रतिनिधी)–** पीएच. डी. प्रवेश व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अनिवार्य असलेला यू.जी. सी. नेट २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, यात येथील युवा रंगकर्मी राहुल दिगांबर जोंधळे उर्फ राजो हे नाट्यशास्त्र विषयातील नेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील नाट्यशास्त्र विषयात त्यांनी एम. ए. पूर्ण केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी हे यश मिळवले आहे. युवा अवस्थेतच मराठी रंगभूमीला योगदान त्यांनी दिले असून, राज्यनाट्य स्पर्धेत आजवर त्यांना सर्वोत्कृष्ट नाटकासह उत्कृष्ट नाट्य लेखक, दिग्दर्शक आदी पुरस्कार मिळाले असून काही नाटके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# सिकलसेल निमिया अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करा -सहसंचालक डॉ. आडकेकर

**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्ह्यातील अरुणोदय सिकलसेल निमिया अभियान यशस्वी करण्यासाठी आणि आरोग्य विभागाच्या विविध राष्ट्रीय कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी आरोग्य सेवा मुंबईचे सहसंचालक डॉ. रामजी आडकेकर यांनी सोमवारी नांदेड जिल्ह्याचा विशेष दौरा केला. यावेळी त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अभियानाच्या स्वरूपाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.



आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम होत आहे. त्यांच्या सूचनेनुसार सिकलसेल निमिया अभियानाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश डॉ. आडकेकर यांनी दिले. या आजाराचे गांभीर्य ओळखून प्रत्येक रुग्णापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे, वेळेवर तपासणी आणि उपचार करणे यावर त्यांनी भर दिला. हे अभियान केवळ सरकारी उपक्रम न राहता ती एक चळवळ व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

बैठकीमध्ये सिकलसेलसह इतरही महत्त्वपूर्ण आरोग्य प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये आरबीएसके, मुलांच्या शस्त्रक्रियेसाठी तपासणी आणि अचूक नियोजन करणे, हत्तीरोग : हत्तीरोग निर्मूलनांतर्गत रुग्ण शोधणे व शस्त्रक्रियांचे नियोजन करणे. कुष्ठरोग– कुष्ठरोग शोध मोहीम प्रभावीपणे राबवणे. क्षयरोग: कार्यक्रमांतर्गत फूड बास्केट वितरणावर विशेष भर देणे, एनसीडी: असंसर्गजन्य आजारांसाठी विशेष कॅम्प आयोजित करणे आणि सातत्याने मॉनिटरिंग करणे, आरसीएच शिबिर: माता व बाल आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली आहे.

केवळ बैठकीपुरते मर्यादित न राहता डॉ. अडकीकर यांनी जिल्ह्यातील अतिदुर्गम आणि आदिवासी माहूर भागांना प्रत्यक्ष भेट दिली. तिथे कार्यरत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी समजून घेतल्या आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर काम करताना घ्यावयाची काळजी व नियोजनाबाबत मोलाच्या सूचना दिल्या.

या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सलमा हिराणी, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. शेख बालन, जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी डॉ. अमृत चव्हाण, डॉ. पवार, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेणुका दराडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व सिकलसेल कॉर्डिनेटर आणि अधिकारी, आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड-बिदर रेल्वे मार्गाचा प्रश्न कर्नाटक विधानसभेत मांडणार -आ. बी. वाय. विजयेंद्र

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड ते बिदर हा बहुप्रतिक्षित नवीन रेल्वे मार्ग कर्नाटकातील विद्यमान राज्य सरकारकडून मंजुरी न मिळाल्यामुळे रखडला आहे. हा प्रश्न कर्नाटक विधानसभेच्या येत्या अधिवेशनात मांडणार असल्याचे आश्वासन कर्नाटकचे भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार बी. वाय. विजयेंद्र यांनी दिले.

नांदेड येथे ५ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या जगद्गुरू केदार पीठाधीश्वर श्री श्री श्री १००८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पट्टाभिषेक रजत महोत्सव व विश्वशांती महायज्ञ सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आ. बी. वाय. विजयेंद्र यांचे सोमवारी सकाळी शहरात आगमन झाले. यानिमित्ताने त्यांनी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली, त्यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी हे स्पष्ट केले.

या भेटीवेळी ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी, शंतनू डोईफोडे, आ. श्रीजया चव्हाण, दक्षिण बिदरचे भाजप आमदार डॉ. शैलेंद्र बेलदळे, बिदर जिल्हा भाजप अध्यक्ष सोमनाथ पाटील, बंगळुरू शहरातील भाजप नेते सिद्धेश, महानगरपालिकेतील भाजप गटनेते अ‍ॅड. महेश कनकदंडे, किशोर स्वामी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेड-बिदर रेल्वे मार्गाचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, केंद्र व राज्य सरकारांच्या ५०:५० खर्च भागीदारीतून हा प्रकल्प राबविण्यास केंद्र सरकारने संमती दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील भाजप सरकारने या रेल्वे प्रकल्पातील आपल्या हिश्याचा खर्च उचलण्याबाबत मंत्रिमंडळात निर्णय घेतला आहे. मात्र, कर्नाटक राज्य सरकारकडून अद्याप या प्रकल्पासाठी खर्चाची जबाबदारी स्वीकारण्यास मंजुरी देण्यात आलेली नाही. त्यामुळे हा महत्त्वाचा प्रकल्प रखडल्याची खंत व्यक्त केली. तसेच आ. बी. वाय. विजयेंद्र यांना कर्नाटक राज्य सरकारच्या पातळीवर तसेच कर्नाटक विधानसभेत हा विषय प्रभावीपणे मांडण्याची मागणी केली.

हा रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यास नांदेड येथील श्री हजूर साहिब आणि बिदर येथील नानक झिरा साहिब ही दोन अत्यंत महत्त्वाची शीख तीर्थक्षेत्रे थेट रेल्वे मार्गाने जोडली जाणार आहेत. त्यामुळे भाविकांची मोठ्या प्रमाणावर सोय होणार असून, पर्यटन, व्यापार व रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. तसेच नांदेड ते बंगळुरू दरम्यानचे रेल्वे अंतरही लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. नांदेडकरांच्या भावना लक्षात घेऊन आ. बी. वाय. विजयेंद्र यांनी कर्नाटक विधानसभेच्या येत्या अधिवेशनात नांदेड-बिदर रेल्वे मार्गाचा प्रश्न प्रभावीपणे मांडण्याचे आश्वासन दिले.

# पिंपळगाव महादेव येथे ७ दिवसीय एनएसएस विशेष शिबीर संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत श्री शारदा भवन शिक्षण संस्था संचालित नांदेड फार्मसी कॉलेज यांच्या वतीने पिंपळगाव महादेव, ता. अर्धापूर, जि. नांदेड येथे ७ दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विशेष शिबीर घेण्यात आले.

या शिबिराच्या समारोप कार्यक्रमास स्वारातीम विद्यापीठातील एपएसएसचे संचालक डॉ. मारोती गायकवाड यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. कार्यक्रमास सरपंच सौ. खंडागळे, उपसरपंच संतोष कल्याणकर, ग्रामविकास अधिकारी एकनाथ कदम तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. नांदेड फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विशाल बलरामनावर, डॉ. नितीन घेवारे व प्रा. शैलेश धूत यांनी स्वयंसेवकांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान एनएसएसच्या स्वयंसेवकांनी सादर केलेले सामाजिक जनजागृती नाटकाला उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी विशेष पसंती दिली.

यावेळी डॉ. मारोती गायकवाड यांनी ग्रामीण सामाजिक जीवन उन्नतीसाठी एनएसएसचे महत्त्व विशद केले तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासातील एनएसएसच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. प्राचार्य डॉ. विशाल बलरामनावर यांनी फार्मसीचे विद्यार्थी आरोग्य जनजागृती व समाजसेवा उपक्रमांद्वारे समाजासाठी कसे योगदान देऊ शकतात हे स्पष्ट केले.

या शिबिरात श्रमदान, स्वच्छता अभियान, आरोग्य जनजागृती कार्यक्रम, गावातील रस्त्यांवर वृक्षारोपण, सामाजिक जनजागृती उपक्रम व ग्रामस्थांशी संवाद असे विविध उपक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हे शिबीर एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय एन. गुंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रा. सौ. एस. ए. टेकाळे व प्रा. ए. के. दासवाड यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले. एनएसएस स्वयंसेवक व ग्रामस्थांच्या उत्साही सहभागामुळे हे शिबीर मोठ्या यशाने संपन्न झाले. या कार्यक्रमास श्री शारदा भवन शिक्षण संस्थेचे सचिव डी.पी. सावंत, आ. श्रीजया चव्हाण व निंबाळकर तसेच डॉ. शेंदारकर यांनी समयोचित मार्गदर्शन केले.

# प्रत्येक नागरिकाने वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे

## रस्ता सुरक्षा सप्ताहात विनय अहिरे यांचे मार्गदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)–** रस्ता अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता रस्ता सुरक्षा जनजागृती अत्यंत आवश्यक असून प्रत्येक नागरिकाने वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड येथील अधिकारी विनय अहिरे यांनी केले.

ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड येथे आयोजित रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमांतर्गत तज्ज्ञ व्याख्यानात ते बोलत होते. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिरे यांनी आपल्या मार्गदर्शनात दुचाकी व चारचाकी वाहन चालवताना हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, वेग मर्यादा, दारू पिऊन वाहन चालवू नये, मोबाइलचा वापर टाळावा, तसेच वाहतूक सिग्नल व नियमांचे पालन करण्याचे महत्त्व सविस्तरपणे सांगितले. अपघातांमागील प्रमुख कारणे आणि त्याचे परिणाम यावर त्यांनी उदाहरणांसह प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून, रस्ता सुरक्षा ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सामाजिक व नैतिक कर्तव्य आहे. थोडीशी काळजी घेतल्यास अनेक जीव वाचवू शकतात, असा संदेश दिला. तसेच अपघात झाल्यास प्राथमिक उपचार व आपत्कालीन मदत कशी द्यावी याबाबतही महत्त्वपूर्ण माहिती दिली. यावेळी त्यांनी विविध स्पर्धेतील विजेत्यांना आरटीओ विभागातर्फे हेलमेट, प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी सर्व उपस्थितांना मोटर वाहन निरीक्षक गणेश शिद यांनी रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करण्याची शपथ दिली.

संकुल संचालक डॉ. विजय पवार, संचालक डॉ. उल्लागड्डी प्रभूलिंग, प्राचार्य मुळे एस. एम., उपप्राचार्य संजय देऊळगावकर यांच्या प्रोत्साहनातून हा कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड येथील मोटार वाहन निरीक्षक गणेश शिद, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक गणेश कंतेवार, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक नेत्रा शिंदे हे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ओमप्रकाश दरक यांनी केले, तर आभार प्रा. यशवंत मोखेडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. पाटील एस. एन., प्रा. पंकज शिंदे, प्रा. वाघमारे धाराजी, डॉ. सुनील कदम आदींसह विभागातील सर्व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. संस्थेच्या वतीने रस्ता सुरक्षा जनजागृती उपक्रम राबविल्याबद्दल आरटीओ नांदेडचे आभार मानण्यात आले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.



**मुखेड–** श्री गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त मुखेड येथील श्री योगीराज गजानन महाराज मंदिर संस्थांनच्यावतीने मुखेड शहरातील मुख्य मार्गाने पालखी मिरवणूक रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी काढण्यात आली. या मिरवणुकीत मनोज जाजू, लक्ष्मण पत्तेवार, जयप्रकाश भुतडा, पत्रकार आशिष कुलकर्णीसह सर्व भाविकभक्त उपस्थित होते. (छाया : गणेश आंबेकर)

# धर्मभूषण वटेमोड महाराज जीवनगौरव पुरस्कार वितरण व अक्षरधारा पुस्तकाचा आज प्रकाशन सोहळा

**नांदेड( प्रतिनिधी)–** धर्मभूषण वटेमोड महाराज सेवा प्रतिष्ठान जुना कौठाच्या वतीने दिला जाणारा धर्मभूषण वटेमोड जीवनगौरव पुरस्काराचे वितरण दि. १० फेब्रुवारी रोजी दुपारी २.३० वाजता विसावा पॅलेस, शिवाजीनगर नांदेड येथे होणार आहे. यंदाच्या या अत्यंत प्रतिष्ठेच्या पुरस्काराचे मानकरी बालयोगी गोवत्स व्यंकट स्वामी महाराज (दत्त संस्थान, हदगाव), मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार निवघेकर, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदचे प्रदेश संघटनमंत्री जनार्दन ठाकूर, बसव बिग्रेडचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. अविनाश भोसीकर, प्रसिध्द बालरोगतज्ज्ञ रितेशसिंह बिसेन आदी पुरस्कारार्थींचा स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात येणार आहे.

याप्रसंगी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त सेवानिवृत्त मुख्याध्यापक डॉ. सायन्ना मठमवार लिखित अक्षरधारा या लेखसंग्रह पुस्तकाचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजीराव पाटील खतगावकर यांच्या हस्ते होणार आहे. या संयुक्त कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हृदयरोग तज्ज्ञ तथा आनंदमयी सेवाश्रम जुना कौठा, नांदेडचे अध्यक्ष डॉ. आर. आर. सिंग हे राहतील तर प्रमुख अतिथी म्हणून आ. आनंदराव पाटील बोंढारकर, नांदेडचे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, गोदावरी अर्बन को-ऑप. बँक नांदेडचे चेअरमन प्रा.डॉ. आर.डी. देशमुख, प्रा. व्ही. एन. नारवाड, साकळे विद्यालय उमरखेडचे सदस्य प्रा.डॉ. वसुधा जोशी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# तरोडा भागातील पालदेवार नगरातील पाण्याच्या टाकीची गळती

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील तरोडा बु. भागात असलेल्या पालदेवारनगरातील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेतील पाण्याची टाकी गळत आहे. यामुळे रस्त्यावर पाणी वाहत असून, पाण्याची नासाडी होत आहे. ही पाण्याची टाकी बरीच जुनी झाली असून, या भागातील लहान मुले व वृद्धांना यामुळे त्रास होत आहे. पाण्याची सतत गळती होत असल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा महानगरपालिकेने तात्काळ उपाययोजना करावी, अशी नागरिकांतून मागणी होत आहे



नांदेड शहरातील तरोडा बु. भागातील पालदेवारनगर वसाहत आहे. या भागातील मोकळ्या जागेत उभारण्यात आलेल्या महानगरपालिका अंतर्गत पाण्याची टाकी असून इथे अनेक महिन्यांपासून सारखी पाण्याची गळती होत आहे. येथील पाणी जमिनीत मुरून इथे दलदलसदृश परिस्थिती निर्माण झाली. याबाबत या भागातील पदाधिकारी तसेच महानगरपालिका कर्मचारी यांनी कल्पना देऊन सुद्धा कुठलीच उपाययोजना केलेली नाही. या भागातील नागरिकांनी वारंवार मनपा प्रशासनाला माहिती देऊनसुद्धा काहीही उपयोग होत नसल्याने नागरीक आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. महानगरपालिका आयुक्त यांनी लवकर पाण्याची गळती थांबविण्यासाठी योग्य ती उपयोजना करावी अशी मागणी या भागातील संदेश वाघ, लाटकर, बाचेवार, बोरकर यांच्यासह अन्य नागरिकांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

# माता रमाई गणगोत पुरस्काराने शिवकांता वागरे सन्मानित




**नांदेड (प्रतिनिधी)–** त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीचे औचित्य साधून माता रमाई विचारमंच, आणि माता रमाई जयंती मंडळ जवळा (दे) ता. लोहा, जि. नांदेड यांच्या वतीने माता रमाई गणगोत पुरस्कार-२०२६ ने शिवकांता शंकरराव वागरे यांना नांदेड आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रमाधिकारी राहूल अत्राम यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, भारताचे संविधान ग्रंथ, पदक, शाल, पुष्पहार असे पुरस्काराचे स्वरुप आहे. यावेळी मंचावर आनंद गोडबोले, भैयासाहेब गोडबोले, राजेश्वर कांबळे, रूपाली वागरे/वैद्य यांची उपस्थिती होती.

शिवकांता वागरे यांनी आपल्या मुलांना उच्चशिक्षित केले आहे. प्रसिध्द साहित्यिक, कवयित्री, लेखिका रुपाली वागरे/वैद्य यांच्या त्या मातोश्री आहेत. साहित्यक्षेत्रातील कर्तृत्वान माता म्हणून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

# संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी

**हदगाव (प्रतिनिधी)–** हदगाव येथे संत रोहिदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त संत रोहिदास महाराज यांची जयंती संत रोहिदास चौक हदगाव येथून मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. संत रोहिदास सभागृह मारुती मंदिर हदगाव येथे मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले.

यावेळी चर्मकार समाजाचे महाराष्ट्रचे अध्यक्ष माधवराव गायकवाड, रोहिदास महासंघ महाराष्ट्रचे अध्यक्ष चंद्रप्रकाश देगलूरकर, हदगाव उपनगराध्यक्ष सुनंदा भोळे, नगरसेवक संदीप हुलकणे, नगरसेवक रंगराव गुडूप, माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन गंगासागर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पांडू खंदारे, माजी नगरसेवक दिलीप गंधारे, नागोराव गंगासागर, ज्ञानेश्वर यलतवार, विशाल घोडेकर यांच्यासह समाजातील अनेक मान्यवरांची उपस्थिती हाती.



या जयंतीनिमित्त विविध मान्यवरांची भाषणे झाली. यावेळी बोलताना भास्कर वानखेडे यांनी संत रोहिदास महाराज सभागृहाची मागणी माजी खासदार सुभाष वानखेडे यांच्या कार्यकाळात झाल्याचे सांगितले. तसेच या सभागृहाच्या ठिकाणी तीन मजली इमारत बांधण्यात येणार असून, खालच्या मजल्यात संत रोहिदास महाराज मार्केट यार्ड या नावाने दुकाने काढण्यात येणार आहेत. तर दुसऱ्या मजल्यावर सभागृह व तिसऱ्या मजल्यावर भोजन व्यवस्था करण्यासाठी हॉल तयार करण्यात येणार असल्याची माहिती वानखेडे यांनी यावेळी दिली.

हदगाव शहरात संत रोहिदास महारा यांची जयंती उत्साहात व शांततेत साजरी करण्यात आली. यासाठी हदगाव पोलिसांनी शहरात चोख बंदोबस्तही लावला होता.

पान १ वरून..

**मिनी मंत्रालय...**

काँग्रेस शरद पवार गट - १, काँग्रेस -१ व अपक्ष १ उमेदवार निवडून आला आहे. परभणी जिल्हा परिषदेमध्ये भाजप -२४, शिवसेना शिंदे गट -५, शिवसेना ठाकरे गट -६, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट -१५, काँग्रेस -३, व अपक्ष १ उमेदवार निवडून आला आहे. धाराशिव जिल्हा परिषदेमध्ये भाजप १९, शिवसेना शिंदे गट -१५, शिवसेना ठाकरे गट -७, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट -६, काँग्रेस -३, समाजवादी -१ तर ४ अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत. लातूर जिल्हा परिषदेमध्ये भाजप -१८, काँग्रेस -२३, शिवसेना शिंदे गट -१, शिवसेना ठाकरे गट -१, राष्ट्रवादी अजित पवार गट - १२, राष्ट्रवादी शरद पवार गट -१, मनसे -१ तर २ अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत. एकूणच या निवडणुकीत महायुतीला मोठा विजय मिळाला असून, भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.

# कृ.उ.बा. समितीचे सचिव योगिराज पवार सेवानिवृत्त



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव योगिराज पवार हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला.

बाजार समितीचे सचिव योगीराज पवार हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल तसेच नवनिर्वाचित सचिव संजय येणुरवार रूजू झाल्यामुळे येणाऱ्यांचे स्वागत व सेवानिवृत्त झाल्याबद्दल निरोप देण्यात आला. यावेळी दोघांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव माणिकराव पाटील बारसे, सहसचिव गणेशराव भारसावडे, लेखापाल बबनराव शेळके, असलम खान पठाण, संजय कदम, त्र्यंबक भोसीकर कंधार, प्रदीप सूर्यवंशी, परिक्षित मुंगल, रविंद्र राठोड, दिलीप रायफलवार, नागोराव माने, आनंदराव घोरबांड, चंद्रकांत पाटील, लक्ष्मीकांत येपूरवार, संजय रेड्डी, मंगलवार यांच्यासह सहकार विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शिवार

# शास्त्रीय पद्धतीने करा शेततळ्याचे खोदकाम

**शेततळ्याचे नियोजन काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. यासाठी शेततळ्यास पाणी पुरविणारा स्रोत समजून घेणे आवश्यक आहे. शेततळ्याची पर्यावरणीय स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी पाण्याच्या स्रोताची स्थिरता आणि गुणवत्ता महत्त्वाची आहे. चिकणमाती असलेली जमीन शेततळ्यासाठी चांगली असते, कारण ती नैसर्गिकरित्या पाणी धरून ठेवते, गळतीचा धोका कमी असतो.**

काहीवेळा गळती रोखण्यासाठी बेंटोनाइट माती किंवा त्या मातीची लाइनर बांधणे आवश्यक आहे. मुसळधार पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी पुरेसा स्पिल वे तयार करावा. यामुळे काठाचा संभाव्य ओव्हर फ्लो टाळता येतो. शेततळ्याची खोली, आकृतिबंध आणि बांधाची कमाल उंची या गोष्टी लक्षात घ्याव्यात. तांत्रिकदृष्ट्या योग्य व्यक्तीकडूनच शेततळ्याचे काम करून घ्यावे. ज्या शेतामध्ये शेततळे तयार करायचे आहे, त्या क्षेत्राचे सर्वेक्षण करावे. जागेचे परीक्षण करताना, मातीच्या प्रकाराचे मूल्यांकन करावे. शेततळ्याला धोका होणार नाही अशा पद्धतीने नाला, ओढ्यामध्ये खोदकाम टाळावे. पाण्याच्या प्रवाहाचा उतार आणि दिशेचे निरीक्षण करावे. नाला, ओढ्याच्या बाजूला शेततळे केल्यास त्यामधून येणाऱ्या पाण्याच्या वेगामुळे ते फुटून जाण्याची शक्यता असते. शेताच्या कोणत्या भागामध्ये पाणी जमा होते किंवा वाहते, हे लक्षात घेऊन शेततळ्याचे खोदकाम करावे. शेततळे करण्यापूर्वी ट्रॅक्टर आणि ट्रॉलीची व्यवस्था करावी. जेणेकरून शेततळ्यामधील निघणारी माती तत्काळ शेतामध्ये पसरता येते. तसेच माती खोदणारे यंत्र सातत्याने काम करत राहाते. यामुळे कमीत कमी तासांमध्ये शेततळे खोदून पूर्ण होते. इनलेट आणि आउटलेट पाइप शेततळे करण्याअगोदर खरेदी करून शेतावर आणून ठेवावेत. कारण शेततळ्याच्या खोदकामासोबतच इनलेट आणि आउटलेट तयार होतात. सिल्ट ट्रॅप बनवण्यासाठी शेतामध्ये छोट्या, मोठ्या आकाराचे दगड उपलब्ध करून ठेवावेत. खोदकाम हे यंत्र चालविणाऱ्या चालकावर अवलंबून असते. त्यामुळे योग्य माणसाची निवड करावी. शेततळ्याच्या चारही बाजूने आठ फूट लांबी आणि पाच फूट उंचीचे कठडे तयार करावेत. शेततळ्याच्या चारही बाजूने उंचवटा केल्याने पाण्याची पातळी वाढते. पाळीव प्राणी आणि माणसापासून शेततळे सुरक्षितता राहते.



## जागा आणि जलस्रोतांचे मूल्यांकन

खोदकाम सुरू करण्यापूर्वी जागेचे संपूर्ण मूल्यांकन आणि जलस्रोत समजून घेणे महत्त्वाचे आहे. जागेचे परीक्षण करताना, मातीच्या प्रकाराचे मूल्यांकन करावे. शेततळे खोदाईच्या ठिकाणी चिकणमाती असणे आवश्यक आहे, जेणेकरून नैसर्गिक अडथळा निर्माण होतो. यामुळे जास्त प्रमाणात पाणी झिरपत नाही. मृद सर्वेक्षणामुळे शेततळ्याच्या जमिनीच्या रचनेची माहिती मिळू शकते. चिकणमातीचे प्रमाण कमी असलेल्या ठिकाणी आवश्यक पाणी टिकवून ठेवण्यासाठी बेंटोनाइट चिकणमाती किंवा सिंथेटिक क्ले लाइनर सारखे पर्याय वापरू शकतो. शेततळ्यामध्ये पाण्याची पातळी राखण्यासाठी योग्य प्रवाह आणि स्वच्छ पाण्याचा स्रोत असणे आवश्यक आहे. पाणलोटाचा आकार पृष्ठभागाच्या प्रवाहाचे प्रमाण निश्चित करतो. पाण्याचा प्रवाह समजून घेताना पृष्ठभागाच्या पाण्याचे मूल्यांकन, भूजल विश्वासार्हता आणि उन्हाळ्यातील पाणीपुरवठ्यावर प्रभाव या गोष्टी लक्षात घ्याव्यात. खोदकाम करताना जादा पाणी वाहण्यासाठी स्पिल वे चा आकार, पाण्याच्या पातळीसाठी तळ्याच्या काठाची रचना तसेच कोरड्या आणि पावसाळी कालावधीसाठी नियोजन आवश्यक आहे.

## शेततळ्याची देखभाल

शेततळ्यामध्ये वनस्पती, शेवाळ नियंत्रण, मातीची धूप आणि प्रदूषण टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात. अतिवृष्टी, हायड्रीला वनस्पतीची वाढ जलमार्गात अडथळा आणू शकते. यातून शेततळ्याच्या पर्यावरणाचे संतुलन बिघडू शकते. यासाठी शेततळ्याची स्वच्छता आणि मजबुतीकरण महत्त्वाचे आहे. सावधगिरीने शेवाळनाशकाचा वापर करावा. धूप आणि प्रदूषण प्रतिबंधाची अंमलबजावणी करावी. मृद आणि जलसंधारणाकडे लक्ष द्यावे. शेततळ्याच्या काठावरील माती स्थिर करण्यासाठी काठाच्याकडेने वनस्पतींची लागवड करावी. ओव्हर फ्लो व्यवस्थित करण्यासाठी पुरेशा स्पिल वे सह शेततळ्याची रचना करावी. कीटकनाशके आणि खतापासून होणारे दूषित टाळण्यासाठी पृष्ठभागावरील प्रवाह व्यवस्थित असावा.

## शेततळे करताना महत्त्वाच्या बाबी

- » शेताच्या क्षेत्रफळाच्या दृष्टीने तसेच पाऊसमान लक्षात घेऊन शेततळ्याचे आकारमान सुनिश्चित करावे.
- » शेततळ्याचे आकारमान हे शेताच्या क्षेत्रफळाच्यादृष्टीने निश्चित केले जाते.
- » शेततळ्याचे आकारमान हे शेताचे क्षेत्रफळ तसेच पीक पद्धती, मातीचा प्रकार अशा गोष्टींवर अवलंबून असते.
- » मध्यम व अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेततळ्यात साठलेल्या पाण्यामुळे फळबाग लागवड तसेच भाजीपाला लागवडीसाठी प्रोत्साहन मिळते, पीक उत्पादन वाढीसाठी फायदा होतो. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत आहे.





# उन्हाळ्यातील ऊस व्यवस्थापन

**मार्च ते जून या कालावधीत तीव्र उष्ण तापमान व पाण्याची कमतरता यामुळे उसाच्या विविध वाढीच्या अवस्थांवर परिणाम होतो. या कालावधीत सरीत पाचट पसरून त्यावर प्रतिटन पाचटासाठी ८ किलो युरिया, १० किलो सुपर फॉस्फेट आणि १ लिटर पाचट कुजवणाऱ्या जिवाणूचा वापर करावा. पाण्याच्या दोन पाळींतील अंतर २० दिवसांपेक्षा जास्त वाढणार नाही याची दक्षता घ्यावी.**

फेब्रुवारी ते जून या कालावधीत उसावर पाण्याचा ताण पडून उत्पादनामध्ये घट दिसून येते. ताज्या उसात वजनाच्या ७० टक्के वजन पाण्याचे असते. प्रकाश संश्लेषण क्रियेमुळे उसामध्ये साखर तयार होते. साखर हा पदार्थ कार्बन, हायड्रोजन व ऑक्सिजन यांच्या संयुगाने बनतो. यातील हायड्रोजन हा केवळ पाण्यातून मिळतो. त्यामुळे पाणी नसेल तर हायड्रोजन मिळणार नाही. साखर निर्मिती होणार नाही. पेशीच्या रिक्तिकेमध्ये मुबलक पाणी असल्यास पेशी फुगलेल्या राहतात. पेशी फुगलेल्या असतील तरच फुटवे येणे, उसाच्या कांड्या वाढणे, कांड्यांची लांबी वाढते. उसाच्या १ ग्रॅम शुष्क वजनासाठी २५० ग्रॅम पाणी शोषण केले जाते.

## पाणी व्यवस्थापन

मार्च ते जून या कालावधीत तीव्र उष्ण तापमान व पाण्याची कमतरता यामुळे उसाच्या विविध वाढीच्या अवस्थांवर परिणाम होतो. या कालावधीत तापमानात वाढ झाल्यामुळे पिकातील ओलाव्यात घट होते. या कालावधीत दिवस व रात्रीच्या तापमानातील फरक कमी होऊन रात्रीचे तापमान वाढलेले असते. जमिनीतील उपलब्ध पाणी कमी होऊन मुळाच्या जवळील तापमान वाढून त्यांची कार्यक्षमता कमी होते. परिणामी, मुळाद्वारे पाणी व अन्नद्रव्याच्या शोषणात घट होते. उसाच्या पानावरील पर्णरंध्राद्वारे होणारे बाष्पीभवन कमालीचे वाढते. आडसाली उसाच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो, कारण ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत असतो. पूर्वहंगामी ऊस देखील पूर्ण वाढीच्या अवस्थेत असतो. वाढ खुंटते, कांड्यांची लांबी व जाडी कमी होते. सुरू व खोडवा उसामध्ये तापमान वाढ झाल्यामुळे खोड किडीचा प्रादुर्भाव वाढतो. सुरू व खोडवा उसाला फूट कमी होऊन गाळप योग्य उसांची संख्या कमी मिळते, परिणामी उत्पादनामध्ये घट येते.

## पाण्याच्या ताणाचे होणारे परिणाम

पाने बुडक्याकडून शेंड्याकडे वाळत जातात. मुळांची कार्यक्षमता घटते, त्यामुळे पाणी व अन्नद्रव्यांचे अपुरे शोषण व प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते. अन्नरसाचे विविध भागांना होणारे वहन कमी होऊन, परिणामी कांड्याची व पानांची लांबी, रुंदी कमी होते. हरितद्रव्याचे प्रमाण घटते. तंतुमय पदार्थाचे प्रमाण वाढून उसात दशीचे प्रमाण वाढून वजन, साखर उतारा घटतो. आडसाली, पूर्वहंगामी उसाची वाढ खुंटून कांड्यांची लांबी, जाडी कमी होते. सुरू, खोडवा उसात फुटव्यांचे प्रमाण कमी होऊन गाळपालायक उसाच्या संख्येत घट होते.

## पीक व्यवस्थापन

बाष्पीभवन पात्राचा वापर करून एकूण ७५ मि. मी. बाष्पीभवन झाल्यावर पिकास पाणी द्यावे. समपातळीत सऱ्या सोडाव्यात. लागण व मोठी बांधणी मिळून हेक्टरी पाच ते सात टन गांडूळ खताचा वापर करावा. पाण्याच्या पाळीतील अंतर ठरवण्यासाठी टेंसीओमीटरचा वापर करावा. त्यामुळे प्रति हेक्टरी पाणी कमी लागते. पिकास पाण्याचा ताण सहन करण्याची सवय लावण्यासाठी डिसेंबरपासून फेब्रुवारीअखेर पर्यंत पाण्याचे पाळीतील अंतर दोन तीन दिवसांनी वाढवत जावे. त्यामुळे पिकाची पाण्याचा ताण सहन करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. पिकाची मुळे अधिक खोलवर जाऊन खालच्या थरातील उपलब्ध पाण्याचा वापर करतात. जमिनीतील उपलब्ध पाण्याचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास घटेल तेव्हाच पाणी द्यावे. पालाश खताची मात्रा (६० किलो प्रति हेक्टर) लागणीच्या वेळी जमिनीतून द्यावी. लागण करताना बेणे म्युरेट ऑफ पोटॅशचे २ टक्के द्रावण किंवा ४ टक्के मॅग्नेशिअम सल्फेट किंवा ४ टक्के (हिराकस) फेरस सल्फेट मध्ये पाच मिनिट बुडवून त्यानंतर लागण करावी. युरिया २ टक्के (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी), म्युरेट ऑफ पोटॅश २ टक्के (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी) या प्रमाणात संयुक्त द्रावणाची फवारणी पिकावर लागणीनंतर ६०, १२० व १८० दिवसांनी करावी. लागणीचे बेणे शिळे झाल्यास चुनखडीचे पूर्ण विद्राव्य स्वरूपातील २ टक्के द्रावण तयार करून त्यात बेणे २ तास बुडवून नंतर लागण करावी. पाचट सरीत पसरून त्यावर प्रतिटन पाचटासाठी ८ किलो युरिया, १० किलो सुपर फॉस्फेट आणि १ लिटर पाचट कुजवणाऱ्या जिवाणूचा वापर करावा. पाण्याच्या



दोन पाळ्यांतील अंतर २० दिवसांपेक्षा जास्त वाढणार नाही याची दक्षता घ्यावी. वाऱ्यापासून संरक्षण म्हणून शेताच्या पश्चिमेस व उत्तरेस शेवरी लावावी, त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग नियंत्रित होतो. सेंद्रिय खताचा वापर करून जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवावे. सेंद्रिय कर्बामुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. खोडव्यामध्ये पाचटाचे आच्छादन करावे, त्यावर एकरी ५० किलो युरिया, ८० किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि २ लिटर पाचट कुजवणाऱ्या जिवाणूंचा वापर करावा.

# उन्हाळ्यात राबवा प्रभावी सिंचन उपाययोजना

**पाणी हा ऊस उत्पादनातील अतिशय महत्त्वाचा व निर्णायक घटक आहे. उन्हाळ्यात पाण्याचे काटेकोर नियोजन आणि व्यवस्थापन करणे हे ऊस उत्पादनासाठी आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या शक्य असल्यास ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. मात्र ज्या शेतकऱ्यांना ते शक्य नाही, त्यांनी प्रवाही पद्धतीची कार्यक्षमता कशा प्रकारे वाढवता येईल, याची माहिती घेऊ...**

भविष्यामध्ये पाणी या सर्वांत महत्त्वाच्या आणि मूलभूत घटकाची कमतरता वाढत जाणार आहे. पाण्याचा कमीत कमी वापर करून जमिनीची सुपीकता आणि पिकाची उत्पादकता कायम ठेवणे हे आपल्यासमोरील आव्हान ठरणार आहे. एकूण बागायतीपैकी ऊस पिकाखालील क्षेत्र आणि वापरले जाणारे पाणी यामुळे ऊस पीक हे नेहमी टीकेला पात्र ठरते. अशा वेळी पाण्याचा अत्यंत काटेकोर वापर करून अधिक उत्पादन शाश्वत स्वरूपात मिळविणे गरजेचे ठरत आहे. शेतामध्ये ऊस १२ ते १८ महिने उभा असतो. वाढीच्या काळात या पिकास बदलत्या हवामानाला तोंड द्यावे लागते, त्यामुळे ऊस उत्पादनात चढ-उतार आढळून येतात. हिवाळ्यात अति थंडी तर उन्हाळ्यात अति उष्णता अशा परिस्थितीत ऊस पीक वाढत असते. यामुळे अपेक्षित उत्पादन मिळण्यात अडचणी येतात. त्यातही उन्हाळ्यातील पाण्याचे दुर्भीक्ष्य हे उत्पादन घटण्यामागील प्रमुख कारण आहे. महाराष्ट्रातील हवामानाचा विचार करता, मार्च ते जून या कालावधीत ऊस पिकास पाण्याचा मोठ्या प्रमाणावर ताण बसतो. मार्च ते जून या चार महिन्यांत संपूर्ण वर्षातील बाष्पीभवनातील ४० ते ४५ टक्के म्हणजे जवळपास निम्मे बाष्पीभवन होते, तर जुलै ते ऑक्टोबर महिन्यात ३० ते ३५ टक्के आणि उरलेले ३० ते ३५ टक्के हे नोव्हेंबर ते फेब्रुवारी या काळात होते.

## पाण्याच्या ताणाचे दुष्परिणाम

ऊस पिकाची पाने बुडख्याकडून शेंड्याकडे वाळत जातात. मुळांची कार्यक्षमता घटते, त्यामुळे पाणी व अन्नद्रव्यांचे अपुरे शोषण होऊन प्रकाश संश्लेषणाची क्रिया मंदावते. अन्नरसाचे विविध भागांना होणारे वहन कमी होऊन पानातील हरितद्रव्यांचे प्रमाण घटते. उसातील तंतुमय पदार्थांचे प्रमाण वाढून उसात धशीचे प्रमाण वाढते. पूर्वहंगामी व आडसाली उसाची वाढ खुंटते. कांड्यांची लांबी व जाडी कमी होते. उसाचे वजन घटते. सुरू हंगामात लागवड केलेल्या व खोडवा पिकात फुटव्यांचे प्रमाण कमी राहते. परिणामी, गाळपलायक उसाच्या संख्येत घट होऊन उत्पादन कमी येते.

## उन्हाळ्यातील हवामान अन् मानवनिर्मित अडचणी

भूगर्भातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत जाते. कालवे व उपसा जलसिंचन योजनांखालील पाण्याच्या पाळीतील अंतर वाढत जाते. विजेचा पुरवठा कमी प्रमाणात होतो. भारनियमनात वाढ होते. त्यात खंड पडतो. हवेतील तसेच जमिनीतील तापमान वाढते. हवेतील तापमान काही वेळा ४५ ते ४८ अंश सेल्सिअसपर्यंत जाते. ऊस पिकाचेही तापमान वाढते. वेगवान व शुष्क हवेमुळे जमिनीतील आणि ऊस पिकातील ओलाव्यात झपाट्याने घट होते. एकूणच बाष्पीभवनाचा वेग वाढतो. उन्हाळ्यात दिवसाचा कालावधी जास्त असतो. दिवसाच्या व रात्रीच्या तापमानातील फरक कमी होतो म्हणजे रात्रीचे तापमानही वाढलेले असते. मुळांभोवती तापमान वाढून त्यांची कार्यक्षमता



कमी होते, परिणामी, मुळांद्वारे पाणी व अन्नद्रव्यांच्या शोषणात घट होते. उसाच्या पानावरील पर्णरंध्राद्वारे होणारे बाष्पोत्सर्जन (ट्रान्स्पिरेशन) कमालीचे वाढते. या सर्व परिस्थितीमुळे ऊस पिकास पाण्याचा ताण बसतो. पिकाची समाधानकारक वाढ होत नाही. पाणीटंचाईमुळे ऊस पिकाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. मुख्यत्वे वाढीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली व पूर्वहंगामी उसाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. अंतिमतः उत्पादनात लक्षणीय घट होते.

## उपाययोजना

ऊस उत्पादनातील घट टाळण्यासाठी प्रवाही सिंचन पद्धतीत काही उपाययोजनांचा अवलंब फायदेशीर ठरू शकतो. प्रवाही सिंचन पद्धतीत उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी लांब सरी, एका आड एक सरी किंवा जोड ओळ पट्टा पद्धतीचा वापर करावा. प्रवाही सिंचनाचे पाट व दांड स्वच्छ ठेवावेत. मे महिन्यातील उपलब्ध पाणी विचारात घेऊन आपल्या शेतातील ऊस पिकाचे क्षेत्र ठरवले पाहिजे. ते त्यानुसार मर्यादित ठेवावे. लांब सरी पद्धतीमध्ये दोन पाळ्यांतील अंतर कमी ठेवावे. प्रत्येक सरीतून उपलब्ध पाण्याचा प्रवाह जास्त खोलीच्या भारी जमिनीत १ ते १.५ लिटर प्रति सेकंद, मध्यम जमिनीत २ ते २.५ लिटर प्रति लिटर पाणी आणि हलक्या जमिनीत २.५ ते ३ लिटर प्रति सेकंद याप्रमाणे विभागून द्यावा. ऊस पिकाची खालील वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावीत. पाचट आच्छादनाने पाण्याच्या दोन पाळ्यांतील अंतर वाढविता येते. किमान पाण्याच्या ३ ते ५ पाळीत बचत होते. शेताच्या बाहेरील बाजूस साधारणपणे एक मीटर पट्ट्याचे पाचट काढू नये. पीक नेहमी तणविरहित ठेवावे. म्हणजे उपलब्ध असलेल्या पाण्यात तण वाटेकरी न होता पाण्याचा उसासाठी पुरेपूर उपयोग होईल. सेंद्रिय व जैविक खतांचा वापर वाढवावा. पाण्याची



उपलब्धता पाहूनच रासायनिक खतांचा वापर करावा. पाण्याचे दुर्भीक्ष्य असल्याने उसास पोटॅश खताची २५ टक्के मात्रा अधिक द्यावी. दर २१ दिवसांनी दोन टक्के म्युरेट ऑफ पोटॅश अधिक दोन टक्के युरिया (प्रत्येकी २० ग्रॅम प्रति लिटर पाणी) यांचे मिश्रण करून फवारणी करावी. पाण्याचा ताण असताना रासायनिक खतांचा वापर जमिनीतून करण्याऐवजी मल्टिन्यूट्रियंट (मॅक्रो आणि मायक्रो) द्रवरूप खतांच्या १ टक्के (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) या प्रमाणे १ महिन्याच्या अंतराने तीन फवारण्या कराव्यात. पट्टा किंवा जास्त अंतरावरील लागवड पद्धतीत मधल्या पट्ट्यात हलकी आंतरमशागत (कुळवणी) करावी. पाण्याचा ताण असलेल्या परिस्थितीत काणी व गवती वाढ या रोगांचा आणि खोडकीड, कांडी कीड, वाळवी अशा किडीचा प्रादुर्भाव वाढतो. काणी व गवती वाढ रोगग्रस्त बेटे मुळासहित काढून नष्ट करावीत. खोडकिडीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनीस या मित्र कीटकाचा अथवा कामगंध सापळे यांचा वापर करावा. १५ मार्चच्या पुढे उसाची नवीन लागवड करू नये. तुटणाऱ्या उसाच्या खोडव्याचे योग्य व्यवस्थापन उदा. पाचट आच्छादन, पाचट प्रक्रिया (युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट आणि पाचट कुजविणाऱ्या जिवाणूंचा वापर), बुडख्यांची जमिनीलगत छाटणी, नांग्या भरणे आणि मल्टिन्यूट्रियंट द्रवरूप खतांची फवारणी ही कामे करावीत.

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# विश्वशांती यज्ञ सोहळा नांदेडकरांसाठी भाग्याचा -खा. अशोकराव चव्हाण



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** -संपूर्ण विश्वात शांती, सौहार्द आणि सनातन धर्माच्या मूल्यांचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने नांदेड येथे भव्य विश्वशांती महायज्ञ व पट्टाभिषेक रजत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास विविध राज्यातील संत, महंत यांची उपस्थिती असून, भक्तीमय वातावरणात हा सोहळा पार पडत असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केले. गोपाळचावडी येथे ९ फेब्रुवारी रोजी आयोजित शिवकथा दरम्यान ते बोलत होते. यावेळी कर्नाटक भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व्ही. वाय. विरेंद्र यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

श्री गुरू दशमुख आश्रम भिमाशंकर नगर धार्मिक व आध्यात्मिक सोहळ्यास दि. ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारीपर्यंत सुरुवात झाली आहे. यामध्ये श्री गुरू दशमुखाश्रम भीमाशंकरनगर, गोपाळचावडी नांदेड येथे सुरूवात झाली असून, श्री हिमवत्केदार वैराग्य सिंहासनाधीश्वर केदारनाथ 'रावल' श्री श्री श्री १००८ जगद्गुरू भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामी यांच्यासह शिव कथाकार प्रयागराज येथे आले आहेत. त्यांच्यासह भाजपा कर्नाटक प्रदेशाध्यक्ष व्ही. वाय. विरेंद्र यांच्यासह मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, माजी आमदार अमर राजूरकर, संत, महंत व आमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जगद्गुरू भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामी म्हणाले की, हिमालयातील केदार पीठावर सहा महिने तपश्चर्या करत, गेल्या अनेक वर्षांपासून सनातन धर्म आणि विश्वशांतीसाठी यज्ञकार्य करणाऱ्या जगद्गुरू भीमाशंकरलिंग शिवाचार्य महाराजांनी या महोत्सवाची माहिती दिली. ते म्हणाले, सध्या समाजात आणि जगात मोठ्या प्रमाणावर अशांतता दिसून येत आहे. अशा काळात विश्वशांतीसाठी सामूहिक यज्ञ व धार्मिक अनुष्ठानांची नितांत गरज आहे. नांदेड ही माझी कर्मभूमी असून, येथेच माझ्या पट्टाभिषेकाचा रजत महोत्सव साजरा व्हावा, ही मनोमन इच्छा होती. या सोहळ्याच्या स्वागताध्यक्षपदी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण हे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, दिल्ली आदी राज्यांतून अनेक महंत, संत, धर्मगुरू आणि मान्यवर या महोत्सवासाठी उपस्थित असून, विशेष म्हणजे या ठिकाणी प्रती केदारनाथ मंदिराची उभारणी करण्यात आली आहे, १०८ जण एकाच वेळी यज्ञ करू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

कार्यक्रमाच्या दरम्यान दररोज सकाळी ५ ते ७ वाजता विश्वशांती यज्ञ, दुपारी १२ ते ३ शिवपुराण कथा, सायंकाळी ३ ते ६ विविध धार्मिक कार्यक्रम, तर रात्री ९ ते १० कीर्तन असे नियोजन करण्यात आले आहे. नांदेडमध्ये होणारा हा विश्वशांती महायज्ञ व पट्टाभिषेक रजत महोत्सव धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा ठरणार आहे. प्रती केदारनाथ मंदिर उभारण्यात आले असून, जगभर वाढत चाललेल्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर नांदेड येथे विश्वशांतीसाठी भव्य महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

हिमालयात तपश्चर्या करून सनातन धर्माचे कार्य करणारे जगद्गुरू भीमाशंकरलिंग शिवाचार्य महाराज या यज्ञाचे प्रमुख मार्गदर्शक आहेत. १०८ जण एकाच वेळी यज्ञ करू शकतील अशी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

# मिरवणुकीत विनापरवाना 'डीजे'; शिवाजीनगर आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरात शनिवारी मोठ्या थाटामाटात व जल्लोषात त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. न्यायालयाच्या आदेशानुसार डीजेच्या डेसीबलवर प्रतिबंध असतानाही शहरातील काही जयंती मंडळांनी विनापरवाना डीजे लावून ध्वनी प्रदूषण करत जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केले. त्यामुळे शहराच्या शिवाजीनगर आणि भाग्यनगर ठाण्यात तीन जयंती मंडळांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात जयंती मंडळाच्या अध्यक्षांचाही समावेश आहे.

शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी रोजी माता रमाई यांची जयंती शहराच्या वेगवेगळ्या भागात साजरी करण्यात आली. सकाळी बौद्ध विहारात त्यांना अभिवादन करून सायंकाळी त्यांच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये जयंती मंडळांनी ठरवून दिलेल्या डेसीबल आवाजानुसार डीजे लावावे, परंतु मोठ्या क्षमतेचा ध्वनी प्रक्षेपण झाल्यास संबंधिताविरुद्ध कारवाई करण्यात येईल अशा सूचना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मंडळांना देण्यात आल्या होत्या. परंतु जयंती मंडळ व पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाचा आदेश झुगारत आपल्या जयंती मंडळामध्ये डीजे लावला. यावरून पोलिसांनी तीन जयंती मंडळांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

यात शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस हवालदार मिर्झा उझउल्ला मिर्झा इब्राहिम बेग यांच्या फिर्यादीवरून आंबेडकरनगर येथील त्रिरत्न बुद्ध विहार सार्वजनिक भीम जयंती मंडळाचे अध्यक्ष आदर्श वाघमारे यांच्यासह डीजे चालक आणि मालक प्रथमेश सुनील तारू (वय २३ रा. धायरी वडगाव वेल्हा जिल्हा पुणे), वाहन चालक गणेश रमेश कांगणे (वय २९ राहणार हरबळ ता. कंधार हल्ली मुक्काम शिवनगर नांदेड) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ४९/ २६ कलम प. स. का. १९८६ चा कायदा कलम १५ अ,१९ ५, ६ कलम भारतीय न्याय संहिता २३ कलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार मंगनाळे करत आहेत.

तर याच ठाण्यात फुले मार्केट नांदेड राहुल जयंती मंडळाच्या मिरवणुकीत डीजे लावणाऱ्यांविरुद्ध पोलीस हवालदार बळवंत केंद्रे यांच्या फिर्यादीवरून मंडळाचे अध्यक्ष अक्षय वाघमारे, डीजे चालक-मालक अविनाश अशोक खरात, वाहन चालक बालाजी गोविंद सांगळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून ट्रॅक्टर क्रमांक (एमएच २६ बीएक्स१६ ६९) तसेच डीजे आणि ट्रॅक्टर क्रमांक (एमएच २६ टी १२ ९२) आणि ट्रॉली क्रमांक (एम एच २६ के ९८ १९) आणि डीजे जप्त करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिरसाट आणि पोलीस हवालदार मंगनाळे करत आहे.

तसेच भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतही माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत डीजे लावणाऱ्या अध्यक्ष गर्व रंजीत गायकवाड राहणार तरोडा बुद्रुक, डीजे चालक आणि मालक तसेच अध्यक्ष राहुल सटवाजी सूर्यतळे राहणार प्रभातनगर, वाहन चालक अभिजीत आनंदा भोरगे, डीजे चालक आणि मालक यांच्याविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या जयंतीमंडळातून विना नंबरचा एक ट्रॅक्टर तसेच (एमएच २६एच ७४ २१) या क्रमांकाचे वाहन राज कॉर्नर ते रेस्ट हाऊस रस्त्यावरून जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्री वसमतकर करत आहेत.

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या चोरट्यांना अटक; ग्रामीण पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)-** पांगरी शिवारातील एका पुलाखाली दरोडा टाकण्याच्या तयारीत दबा धरून बसलेल्या सातपैकी चार चोरट्यांना नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. अटक केलेल्या चोरट्यांकडून पोलिसांनी पिस्तूल, मॅक्झिन, दोन जिवंत काडतूस, खंजर, मिरची पूड, लोखंडी पाईप, नायलॉन दोरी आणि वेळूची काठी असा एक लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सराईत गुन्हेगारांना प्रतिबंध बसावा आणि कायदा व सुव्यवस्था बाधित होणार नाही याची काळजी घेत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पोलीस उपनिरीक्षक सुनील भिसे आणि वेंकट कुसमे यांच्या पथकाला पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर हे पथक विष्णुपुरी विद्यापीठ परिसरात गस्त घालत होते. त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून या पथकाने पांगरी शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांना पकडण्यासाठी सापळा रचला.

या प्रसंगी पोलिसांनी पोलिसांनी टोळीतील चार जणांच्या मुसक्या आवळीतत्यांना अटक केली. मात्र तिघेजण घटनास्थळावरून पसार झाले. त्यांनाही पोलिसांनी पकडण्याचा प्रयत्न केला. ते हाती लागले नाहीत. अटक केलेल्यांमध्ये शेख आयान शेख मुजीब (वय १९ राहणार जवाहर नगर तुप्पा, नांदेड), मैफुज शेख सलीम (वय २१ राहणार म्हाडा कॉलनी नवीन कौठा, नांदेड), शुभम शिवाजी जाधव (वय २७ राहणार धुमाळवाडी असर्जन नांदेड) आणि सुजित सूर्यकांत चव्हाण (वय २४ राहणार काळेश्वर विष्णुपुरी नांदेड) यांचा समावेश आहे. अटक केलेल्या चोरट्यांकडून पिस्तूल व अन्य साहित्य जप्त केले. पोलीस हवालदार अर्जुन मुंडे यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात वरील चार जणांसह अन्य तिघांविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कुरुंदकर पुतळ्यास मालार्पण

**नांदेड (प्रतिनिधी)** - प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या ४४ व्या स्मृतिदिनानिमित्त १० फेब्रुवारी २०२६ रोजी नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानच्यावतीने भाग्यनगर येथील कुरुंदकर पुतळ्यास सकाळी ८ वाजता मालार्पण कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## वामनराव लाठकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** - वामनराव मल्हारी लाठकर (सेवानिवृत शिपाई जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड) रा. सुन्दर नगर नांदेड यांचे दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वा. निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८६ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर, सोमवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी गोवर्धनघाट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी व नातवंड असा परिवार आहे.

# अर्धापूर येथे आज मोफत 'ताणतणाव निवारण व मानसिक आरोग्य' शिबीर

**अर्धापूर (प्रतिनिधी)** - श्री गुरुगोविंदसिंघजी स्मारक शासकीय रुग्णालय, नांदेड आणि जिल्हा मानसिक आरोग्य सेवा कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रेरणा प्रकल्प' अंतर्गत अर्धापूर येथे मानसिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर ग्रामीण रुग्णालय, अर्धापूर येथे पार पडणार आहे.

ग्रामीण रुग्णालय, अर्धापूर येथे मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये विविध मानसिक समस्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत औषधोपचार व समुपदेशन केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने मानसिक रोग, डिप्रेशन (नैराश्य), सततचे टेन्शन आणि बेचैनी, जुनाट डोकेदुखी आणि झोपेचे विकार, व्यसनमुक्ती समस्या, फिट्स येणे, लैंगिक समस्या, वृद्धापकाळातील विसरभोळेपणा, तसेच भानामती, करणी यांसारख्या गैरसमजातून निर्माण होणारे मानसिक आजारावर उपचार व मार्गदर्शन दिले जाणार आहे. रुग्णांनी आपली जुनी वैद्यकीय कागदपत्रे आणि पूर्वी घेतलेल्या उपचारांचे सर्व रिपोर्ट सोबत आणावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विद्या रामचंद्र झिने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शाहू शिराढोणकर यांच्यासह ग्रामीण रुग्णालय अर्धापूरचे सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# भोई समाज भवनाचे आमदार कल्याणकर यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील विष्णूनगर (भोईगल्ली) येथे मराठवाडा भोई समाज विकास मंडळातर्फे समाज भवनाचे भूमिपूजन व मनपा नवनिर्वाचित नगरसेकांचा सत्कार सोहळा पार पडला.

याप्रसंगी अखिल भारतीय भोई समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी प्रशासकीय अधिकारी सिडको व समाजाचे मार्गदर्शक गजानन साटोटे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख उद्घाटक म्हणून नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांचीही उपस्थिती होती. भोई समाज भवन बांधकामासाठी योग्य ते सहकार्य करण्याचे आमदार कल्याणकर यांनी आश्वासन दिले.

यावेळी सर्वप्रथम मराठवाडा भोई समाज विकास मंडळाचे अध्यक्ष राजू मामूलवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास नवनिर्वाचित नगरसेवक तथा माजी महापौर बलवंतसिंग गाडीवाले, नगरसेविका सदिच्छा सोनी, डॉ. मंजूषा रानवळकर, नगरसेवक योगेश उमेश मुंडे, नगरसेवक अमरजीतसिंग कुंजीवाले, शिवसेना शहर प्रमुख तुलजेश यादव, माजी नगरसेवक प्रतिनिधी महेंद्र खेडकर, धर्माबाद नगरपरिषदेचे नगरसेवक सतीश उशलवार, किनवटचे नगरसेवक प्रभू कोल्हे, लोहा नगसेवक नारायण येलरवाड, भाजपचे कार्यकर्ते पुरभाजी कोमटवार, उमरीचे नगरसेवक गजानन अडगुलवाड, मराठवाडा भोई समाज महिला अध्यक्षा अरुणा टोपलवाड, नांदेड जिल्हा महिला अध्यक्षा कौशल्या उशोलवार व पुष्पा दोन्तेवार, सचिव जगदीश कोटगीरे, राजेंद्र मामूलवार, सत्यनारायण दोतेवार, लालमण बिरकुरे, रमेश मामूलवार, शेवडे, प्रकाश मामूलवार, नरसय्या दुम्पलवार, पंकज उशोलवार, लिंगूराम उशलवार, प्रकाश मुत्तेवार, देवीदास दुम्पलवार, संतोष मामूलवार, व्यंकटेश मामूलवार, श्रीनिवास मुत्तेवार, हिरामण कोटगीरे, प्रशांत मामूलवार, संतोष हिवरे, गणेश मामूलवार, रवी दोम्पलवार, ओम कोडगिरे, कृष्णा चौधरी, बालू प्रकटवार यांच्यासह आदी पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.

## नांदा सौख्यभरे

### खांडील-चोटीया

**नांदेड** -येथील रहिवासी स्व. सुलोचनादेवी व स्व. डॉ. ॲड. रामेश्वर खांडील (बोचीवाल) यांची नात आणि सौ. दया व डॉ. आदेश रामेश्वर (शर्मा) खांडील (बोचीवाल) यांची कन्या चि. सौ. कां. अनुश्री यांचा शुभविवाह बीड येथील रहिवासी सौ. कलावती व श्री सुखदेव बद्रीनारायण चोटीया यांचे नातू आणि सौ. आरती व रविंद्र सुखदेव चोटीया यांचे चिरंजीव प्रितीश(हेमंत) यांजसमवेत मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता ओम गार्डन येथे संपन्न होत आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

-संपादक

# चार साहिबजादे शिख युथ फेस्टीव्हलच्या बक्षिसांचे वितरण



**नांदेड (प्रतिनिधी)-** सिख एज्युकेशन वेलफेअर असोसिएशन सेवा या संस्थेचे अध्यक्ष जरनैलसिंघ गाडीवाले यांच्या वतीने श्री गुरुगोविंदसिंघ यांचे चार पुत्र अर्थात चार साहिबजादे यांच्या पावन स्मृतीप्रीत्यर्थ बारावे सिख युथ फेस्टीव्हल-घेण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्यांना बाबा हरमानसिंघ प्रतिनिधी गुरुव्दारा लंगर साहिब बाबा तेजासिंघ मुखी गुरुव्दारा मातासाहिब यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

दिवान टोडरमल मिनी स्टेडीअम खालसा हायस्कूल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गुरुव्दारा अधीक्षक हरजितसिंघ कडेवाले, आयटीआयचे प्राचार्य गुरबच्चन शिलेदार, नारायणसिंघ बासरीवाले, राजेंद्रसिंघ शाहू यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. दोन दिवसीय चाललेल्या या फेस्टीव्हलमध्ये गुरुबाणी कंठ, पगडी बांधणे, हॉकी, व्हॉलीबॉल, गोळाफेक अशा स्पर्धा घेण्यात आल्या. गुरुबाणी कंठ महिला स्पर्धेमध्ये प्रथम रितेश कौर कराबीण, द्वितीय खुशमितकौर भाटिया, तृतीय मनदीपकौर टाक, तर पुरुष गटामध्ये प्रथम हजुरसिंघ संरपच, व्दितीय गुरबाजसिंघ कांचवाले, तृतीय सुखविंदरसिंघ अवतारसिंघ यांनी विजतेपद पटकावले. तर पगडी बांधणे स्पर्धेमध्ये प्रथम हर्षदीपसिंघ सिध्दू, द्वितीय जपअमरितसिंघ सोढी, तृतीय जयदीपसिंघ पाठी हे मानकरी ठरले. तसेच हॉकी १४ वयोगटात प्रथम लक्खी शहा बंजाराजी, द्वितीय शेर महमद खॉन नवाब मलेर कोटला, तृतीय साहिबजादा जुजारसिंघजी या संघाने पद पटकावले.

तसेच व्हॉलीबॉलचे प्रथम साहिबजादा अजितसिंघ, द्वितीय साहिबजादा फत्तेहसिंघ आणि तृतीय साहिबजादा जोरावरसिंघ या संघाने पद जिंकले असून, गोळाफेकमध्ये प्रथम शिवानी कदम, द्वितीय छाया देशमुख, तृतीय स्नेहा कुरे यांनी पदे जिंकली. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वाटप स्पर्धकांना करण्यात आले. सेवा संस्थेचे चेअरमन जरनैलसिंघ गाडीवाले यांनी सिख युथ फेस्टीव्हलचे आयोजन केले होते. हा उपक्रम खेळाडुंना प्रोत्साहित करणारा असून, चार साहिबजादे यांनी कमी वयात मानवतेसाठी व अधर्माच्या विरुध्द लढा देताना शहिदी स्वीकारली. यांचा आदर्श घेवून युवकांनी पुढे जावे, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना केले.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस १२ तासांच्या आत केले जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नवीन नांदेड़ (प्रतिनिधी)** – ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील वडगाव परिसरात जुन्या वादातून आकाश बालाजी पुयड वय २१ वर्षे या युवकाचा धारदार शस्त्राने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून खून केला. या घटनेतील पाच ते सहा आरोपींनी पलायन केले. या प्रकरणी स्थानिक गुन्हा शाखेने दोन पथके तयारी केली होती. या घटनेतील एका आरोपीला बारा तासांच्या आत जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये गंभीर गुन्हे करणाऱ्या आरोपीचा शोध घेवून गुन्हे उघडकीस आणण्याचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखा नांदेडचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीत मौजे वडगाव येथे एका युवकाचा जुन्या भांडणाचे कारणावरुन धारदार शस्त्राने खून केला होता. त्यानंतर स्थानिक गुन्हा शाखेच्या दोन वेगवेगळ्या पथकाने सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध सुरू केला. यावेळी पथकाला गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली. नमूद गुन्ह्यातील आरोपी नामे पवन पुयड हा शंकरराव चव्हाण चौकाजवळ ओव्हर ब्रिजखाली थांबलेला होता. या माहितीवरून दोन्ही पंचांसमक्ष पोलिसांनी सापळा लावून आरोपी पवन माणिक पुयड वय २२ वर्षे रा. वडगाव, ता. जि. नांदेड यास ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांनी आरोपीला विश्वासात घेवुन सखोल चौकशी केली असता त्याने इतर साथीदारांच्या मदतीने जुन्या भांडणाच्या कारणावरून मयताला लाथाबुक्याने, काढीने, धारदार शस्त्राने मारहाण केली. यात मयताच्या पाठीवर पाटीवर, गळ्याचे खाली, छातीवर गंभीर वार करून खून केल्याची कबुली दिली.

या गंभीर गुन्ह्यातील इतर आरोपींना ताब्यात घेण्यासाठी शोध मोहीम सुरु आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस १२ तासांच्या आत ताब्यात घेवून पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले असून, गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गाढवे हे करीत आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com